दैनिक
www.sahyandrinews.com
# सह्याद्रीचा राखणदार
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोना (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ०९ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.२७ ऑक्टोबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# भाजपच्या ४० स्टार प्रचाकांची यादी जाहीर

## मोदी,शहा,योगी यांच्यासह देश,राज्यातील नेत्यांत नवनीत राणा यांच्याही नावाचा समावेश

**मुंबई (वृत्तसंस्था)**–आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाने आपल्या ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, अमित शाह यांच्यासह महाराष्ट्रातील नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्या दिग्गज नेत्यांचा समावेश आहे. राज्यातील प्रमुख मतदारसंघांमध्ये प्रचाराची धुरा पेलण्यासाठी या दिग्गज नेत्यांना पाठविण्यात येणार आहे.भाजपच्या या स्टार प्रचारकांमध्ये देशभरातील दिग्गज नेत्यांचा समावेश आहे. राज्यात विशेषत: युवा आणि शेतकरी वर्गामध्ये प्रभाव असणारे हे नेते स्थानिक नेत्यांसोबत मतदारांपर्यंत पोहोचून पक्षाच्या विकास योजनांचा प्रसार करतील. प्रचारादरम्यान ते केंद्र सरकारच्या महत्त्वपूर्ण योजना आणि राज्यातील भाजपच्या धोरणांचा आढावा घेऊन जनतेपर्यंत पोहोचवणार आहेत.




## ४० दिग्गज नेते राज्यात करणार प्रचार

स्टार प्रचारकांच्या यादीत भाजपच्या अनेक केंद्रीय नेत्यांचा समावेश करण्यात आला आहे, त्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, जेपी नड्डा, राजनाथ सिंह, अमित शाह ,नितीन गडकरी, योगी आदित्यनाथ, प्रमोद सावंत, भुपेंद्र पटेल आणि विष्णू देव साई यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील भाजपच्या मुख्य नेत्यांमध्ये देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांत पाटील, राधाकृष्ण विखे पाटील, पंकजा मुंडे, विनोद तावडे आणि आशिष शेलार यांना देखील प्रचारासाठी पुढे आणले आहे. याशिवाय भाजपचे इतर लोकप्रिय नेते, खासदार आणि मंत्री देखील यामध्ये आहेत, ज्यांच्यामध्ये स्मृती इराणी, रावसाहेब दानवे, नारायण राणे, पियुष गोयल, भूपेंद्र यादव आदींचा समावेश आहे.या प्रचारकांना राज्याच्या विविध भागांत प्रचारासाठी पाठवले जाणार आहे. विविध समाजघटकांमध्ये भाजपचे विचार, नीतिनियम आणि योजनांची माहिती पोहोचवण्यासाठी या स्टार प्रचारकांचा उपयोग केला जाणार आहे. ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये स्थानिक नेतृत्वासोबत हे दिग्गज नेते जनतेशी संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घेणार आहेत आणि भाजपच्या योजनेचे समर्थन करणार आहेत.राज्यातील विधानसभा निवडणुकीत अधिकाधिक जागा जिंकण्यासाठी भाजपचे नेतृत्व सर्वतोपरी प्रयत्न करत असून, या स्टार प्रचारकांची उपस्थिती पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये नवा जोश निर्माण करेल, असा भाजपचा विश्वास आहे.

## नवाब मलिकांचा निर्धार कायम भाजपच्या विरोधानंतरही २९ तारखेला अर्ज दाखल करण्याची तयारी



**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीतील उमेदवारीवरून तणाव वाढताना दिसत आहे. भाजपकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांच्या उमेदवारीला विरोध दर्शवण्यात आला असून, त्यामुळे राष्ट्रवादीने त्यांच्या ऐवजी नवाब मलिक यांच्या मुलीला, सना मलिक यांना अणुशक्तीनगर मतदारसंघातून तिकीट देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, नवाब मलिक यांनी आपल्या भूमिकेवर ठाम राहण्याचा निर्धार व्यक्त करत २९ तारखेला अर्ज दाखल करण्याची घोषणा केली आहे.

वाब मलिक यांच्या निर्णयामुळे महायुतीतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आले आहेत. ते शिवाजीनगर–मानखुर्द मतदारसंघातून अपक्ष किंवा राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवण्याचा विचार करत आहेत. मी निवडणूक लढणारच, अशी ठाम भूमिका त्यांनी जाहीर केली आहे. भाजपच्या विरोधानंतरही ते आपल्या निर्णयावर ठाम राहतील, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रफुल्ल पटेल, आणि छगन भुजबळ यांनी नवाब मलिक यांची भेट घेतली. परंतु, या चर्चेनंतरही मलिक आपल्या भूमिकेत कोणताही बदल करण्यास तयार नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे महायुतीत येत्या काळात या वादावर काय तोडगा निघतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.भाजपने निवडणुकीसाठी आपली दुसरी उमेदवार यादी देखील जाहीर केली आहे. यामध्ये २२ नव्या उमेदवारांची नावे समाविष्ट असून, गोपीचंद पडळकर यांना जतमधून आणि देवयानी फरांदे यांना नाशिक मध्य मतदारसंघातून तिकीट देण्यात आले आहे. पहिल्या यादीत ९९ उमेदवारांची नावे जाहीर केल्यानंतर आता एकूण १२१ उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. महायुतीतील या अंतर्गत घडामोडींमुळे आगामी विधानसभा निवडणुकीत काय राजकीय समीकरणे तयार होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## तुमची चाळीस वर्षे केलेली नाकामी उघडी पडली आहेत–डॉ.सुजय विखे पाटील

**संगमनेर। प्रतिनिधी**

राहुरी आणि गणेश कारखान्यावर आरोप करणारे आपल्या कारखान्याच्या बोगद्यातून चोरी गेलेल्या साखरेचे उत्तर तालुक्याला का देत नाही? तालुक्याप्रती तुम्हाला कोणतेही प्रेम राहीलेले नाही. केवळ तिरस्कार करुन, दहशत निर्माण करण्याची तुमची पध्दत आता जनतेने ओळखली आहे. तुमची चाळीस वर्षांची नाकामी आता उघडी पडली असल्याचा आरोप डॉ.सुजय विखे पाटील यांनी केला.

धांदरफळ येथे आयोजित केलेल्या युवा संकल्प मेळाव्यात डॉ.सुजय विखे पाटील यांनी पुन्हा एकदा आ.थोरातांच्या निष्क्रीयतेवर बोट ठेवून तीन सभांमधून विचारलेल्या एकाही प्रश्नाचे उत्तर देवू न शकल्या बद्दल परखड टिका केली. ही तर आत्ता सुरुवात आहे. परंतू डोक्यावर पडल्याचा आरोप माझ्यावर करणा–यांचे डोके बंद पाडल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही असा इशाराही त्यांनी दिला.तालुक्यात युवकांचे वादळ आता सुरु झाले आहे. कोणीही थांबायला तयार नाही. प्रत्येक माणूस तुमच्या दहशतीला झुगारुन बाहेर पडला आहे. तुम्ही कोणाकोणाला थांबविणार चाळीस वर्षात तुम्ही ज्यांना फोन केले नाही त्यांना आता फोन सुरु झाले आहे. ज्यांना कधी विचारले नाही ज्यांना आता काय पाहीजे अशी विचारणा होवू लागली आहे. माझा दौरा जिथे असतो



तिथे लोकांना रोखण्यासाठी आता यांची यंत्रणा सक्रिय झाली. पण तुम्हाला आता यश येणार नाही.आमच्या भागात आल्यावर कायम राहुरी आणि गणेश कारखाना बंद पाडल्याचा आरोप आमच्यावर केला जातो. संस्था कशा चालवायच्या आम्हालाही कळतात, पण तुमच्या कारखान्याच्या बोगद्यातून हजारो क्विंटल साखर चोरीला गेलीच कशी असा सवाल करुन, अनेक वर्षे तालुका याचे उत्तर मागत आहे. अमृतवाहीनी बॅंकेचे चेअरमन बॅंक घोटाळ्यात तुरुंगात गेला कसा, भ्रष्ट्राचार कोणी केला, मग तुमच्या संस्था चांगल्या कशा, तीन सभांमधून विचारलेल्या प्रश्नांला फक्त बगल देण्याचे काम या तालुक्यातील आमदार करीत असल्याचा आरोप त्यांनी केला.घुलेवाडी सभेचा उल्लेख करुन डॉ.सुजय विखे पाटील म्हणाले की, यातालुक्यात डोंगर द–या आणि दुष्काळी भाग असल्याचा उल्लेख केला जातो ही तुमच्या चाळीस वर्षांची नाकामी आहे. वर्षानुवर्षे या तालुक्यातील महीलांच्या डोक्यावरील हंडा तुम्ही उतरवू शकला नसलयामुळे ही जबाबदारी आता मी घेणार आहे. या तालुक्यातील युवक त्यांच्या भवितव्यासाठी यंदा मतदान करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.बाहेरुन आल्याचा आरोप आमच्यावर करता मग कारखान्याची स्थापना करताना पद्मश्री कसे चालले. आमच्या संस्थेवर टिका करता पण ज्या गणेश कारखान्याची जबाबदारी आमदारांनी घेतली त्याचा भाव त्यांनी फक्त २८०० रुपये दिला. त्यांच्या स्वत:च्या कारखान्यातील ३०१० रुपये दिला. प्रवरा कारखान्याने मात्र ३२०० रुपये भाव दिला मग सांगा आता संस्था कोणाच्या चांगल्या. आम्ही कतृत्वाने मोठे झालो. येथील बाजारपेठ फुलली असेल तर यामागे महायुती सरकारची धोरण आणि योजना कारणीभूत आहेत. लाडक्या बहीणींबरोबरच शेतक–यांनाही आर्थिक मदत केली.

आमच्याकडे आता विश्वासाने माणसं येत आहेत. तुमचे प्रेमही आता लोकांना नकोसे झाले आहे. कारण तुमच्या प्रेमामध्येही दडपशाही आहे. प्रेमात घेवून काटा काढण्याची तुमची प्रवृत्ती आता उघड झाली आहे. आमच्या सभांना कामगारांना बोलावून हजेरी घेण्याची वेळ आलेली नाही. कार्यकर्त्यांचा फक्त वापर करायचा याचा परिणाम स्व.अशोक मोरेंनाही भोगावा लागला. याची आठवण करुन देत, जेष्ठ कार्यकर्त्याला कारखान्याच्या निवडणूकीतही आमदारांपेक्षा जास्त मतं मिळविले म्हणून कसे बाजूला टाकले जाते याची आठवण आता जनतेने ठेवली असल्याने तुमच्या प्रेमालाही आता लोकं घाबरू लागले आहेत. त्यामुळेच या तालुक्यात आता परिवर्तन अटळ आहे. कुठल्याही परिस्थितीत आमदार महायुतीचाच होणार असा दावा त्यांनी केला.याप्रसंगी जेष्ठनेते वसंतराव देशमुख, रोहीदास डेरे, विक्रमसिंग खताळ, अमोल खताळ, संजय मोरे यांचीही भाषणं झाली. धांदरफळ आणि पंचक्रोशितील गावांमध्ये डॉ.सुजय विखे पाटील यांचे जंगी स्वागत झाले.

# विरोधकांसाठी लाडक्या बहिणींच पुरेशा नाना पटोलेंवर देवेंद्र फडणवीसांचा हल्लाबोल

## उमेदवारी अर्ज दाखल करत सहाव्यांदा मैदानात

**नागपूर (वृत्तसंस्था)**

नागपूरकरांशी मला जास्त बोलण्याची आवश्यकता नाही. कारण नागपूर शहरामध्ये आमचे काम बोलते, असे म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी मोठे शक्ती प्रदर्शन केले. यावेळी राज्यातील भाजपचे सर्वच मोठे नेते उपस्थित होते. नागपूर येथील जनतेच्या आशीर्वादामुळेच मी राज्यासाठी काम करू शकलो, राज्याचा उपमुख्यमंत्री होऊ शकलो, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

नागपूर आणि विदर्भात परिवर्तन घडवून दाखवले असल्याचा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. नागपूर शहरातील विकास पाहिला तर बदल दिसून येतो. त्यामुळे माझ्यापेक्षा माझे काम बोलत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. विरोधकांबद्दल बोलायची गरज नाही. मी त्याविषयी बोलणार नाही. त्यांच्यासाठी केवळ आमच्या लाडक्या बहिणी पुरेशा आहे, असे देखील फडणवीस म्हणाले. ज्या लाडक्या बहिणींच्या तोंडाचा घास पळवण्यासाठी सुनील केदार आणि नाना पटोले यांनी नागपूरच्या न्यायालयात केस केली. त्या लाडक्या बहिणीच त्यांना पुरुन उरतील, असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी दिला.मुलींसाठी मोफत शिक्षण असेल, शेतकऱ्यांसाठी मोफत मोफत बीज असेल, दिन, दलित, गरीब, आदिवासी, शेतकरी सर्वांसाठी आम्ही केलेले काम बोलत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

ओबीसी समाजासाठी ४८ जीआर काढणारे महायुतीचे सरकार आहे. मात्र महाविकास आघाडीच्या सरकारचा एक तरी जी आर दाखवावा, असे आव्हान देखील त्यांनी दिले आहे. ओबीसी समाजासाठी आम्ही हॉस्टेल तयार करून दाखवले. मात्र, महाविकास आघाडीचे सरकार एकही हॉस्टेल तयार करू शकले नसल्याचा आरोप त्यांनी केला.नागपूर जिल्ह्यामध्ये तीन उमेदवारी अर्ज दाखल होत असताना आणखी तीन आमदार आमच्या सोबत येणार असून मुंबईतील विधानभवनात नागपूरचा आवाज बुलंद होणार असल्याचा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला. महाराष्ट्रात पुन्हा एकदा महायुतीचा झेंडा फडकवणार असल्याचा दावा देखील यावेळी फडणवीस यांनी केला.



# राजकारणातील बेडूक उड्या

**अलीकडे राजकारण धंदा झाला आहे. पूर्वी लोकांची सेवा करण्यासाठी नेतेमंडळी राजकारणात उतरायची. आता अपवाद वगळता समाजसेवेच्या नावाखाली स्वतः मेवा खाण्यासाठी राजकारणात समाजसेवेचे ढोंग केले जाते.स्वार्थासाठी या पक्षातून त्या पक्षात सोईस्करपणे बेडूक उड्या मारल्या जातात. मतदारांनी पाच वर्षासाठी निवडून दिले असताना मनात आले तेव्हा पक्षांतर करतात ही मतदारांशी प्रतारणा आहे. स्वतःच्या कर्तुत्वावर जर एवढा विश्वास आहे तर जुन्या पदाचा राजीनामा द्या आणि मग कुठेही जा. कारण मतदारांनी तुम्हाला त्या पक्षात पाच वर्षांसाठी निवडून दिले आहे. मतदारांचा विश्वासघात करून मुदतीपूर्वीच दुसऱ्या पक्षात जाण्याचा तुम्हाला नैतिक अधिकार नाही. असेच नाटक सुरू राहीले तर सामान्य लोकांचा लोकशाहीवरील विश्वास उडून जाईल. तो कायम ठेवायचा असेल तर  एकदा निवडून आल्यानंतर निदान पाच वर्षे तरी तो पक्ष सोडून जाऊ नका.**

अलीकडे वाचायला कोणतेही वर्तमानपत्र उघडा वा टीव्ही सुरू करा. काही बातम्या हमखास ठरल्याप्रमाणे वाचायला व ऐकायला मिळतात. अमुकाने पक्ष बदलला. अमुक त्या पक्षात गेला. इतक्या लोकांनी पक्षांतर केले. सामूहिक पक्षप्रवेश. शेवटी आशय एकच. जसे एकाच साच्यातून वेगवेगळ्या रंगाच्या चकल्या काढाव्या तशा या बातम्या ऐकूनऐकून सामान्य माणसांचा भ्रमनिरास होत चालला आहे. ऐकणाऱ्यांचे कान पकत आहे. कोण कुठल्या पक्षात गेले? कोण कुठल्या पक्षात शिल्लक आहे? कोण कुठल्या पक्षात जाणार आहे? याच्याशी सामान्यजणांना काहीही देणे घेणे नसते. जे देणे घेणे आहे ते फार तर त्या नेत्यांच्या चमच्यांना, कार्यकर्त्यांना. साहेबांच्या जाण्याचे दुःख उराशी बडवत ही चमचे उर्फ कार्यकर्ते मंडळी साहेबांच्या मागेमागे फरपटत जात असतात. त्यांच्या या साहेबांना ना कुठलेही तत्व असतं ,ना कुठलाही पक्की विचारधारा. ना कुठले मनाशी ठरलेले आचारविचार असतात. यांना प्रिय असते ती फक्त खुर्ची आणि सत्ता. त्यासाठी ही मंडळी

तत्वाच्या गोंडस नावाखाली आपल्या कार्यकर्त्यांसह सर्वांनाच मूर्ख बनवत असतात.

तत्त्व,निष्ठा यांच्याशी त्यांना काही देणे घेणे नसते. केवळ सत्तेसाठी समाजसेवेचा बांगरबुवा उभा करीत अंधानुकरण करतात. 'जिधर दम, उधर हम' अशा पध्दतीने वागतात. कार्यकर्ता या गोंडस नावाखाली एका पक्षात वावरायचे. दुसऱ्या पक्षात निवडून यायचे, तिसऱ्या पक्षात पक्षांतर करायचे. चौथ्या पक्षात निष्ठेच्या गप्पा मारायच्या. पाचव्या पक्षात सत्तेचा उपभोग घ्यायचा. लोकांसारखे ब्रह्मज्ञान आणि आपण कोरडे पाषाण अशी अलीकडे नेत्यांची अवस्था आहे.अलीकडे नेत्यांचे हे आचरण बघून निष्ठा नावाचा शब्द भविष्यात शिल्लक राहणार की नाही असे वाटायला लागलेले आहे. अपवाद वगळता स्वतःच्या स्वार्थासाठी व स्वतःची पापे लपविण्यासाठी ही मंडळी इकडून तिकडे, तिकडून ईकडे सर्वत्र बेडूक उड्या मारताना दिसतात. ज्या पक्षाच्या चिन्हावर, ज्या पक्षाच्या ध्येयधोरणावर आपण निवडून आलो. नागरिकांनी शून्यातून मोठे केले. त्याच्याशी यांना काहीही सोयरेसतुक नसते. उलट आपल्या सोयीनुसार, आपल्या पद्धतीने राजकारणाचा अर्थ लावत ही नेतेमंडळी वरिष्ठांची खुषमस्करी करत नव्या पक्षात जमवून घेत असतात. एकदा सरड्याला तरी रंग बदलण्यात लाज वाटेल. पण नेते मंडळींना पक्षांतर करण्यात कुठलीही लाज लज्ज्ञा वाटत नाही.

पूर्वी राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये निष्ठा हा गुण फार महत्त्वाचा मानला जात होता. राजकारणातील सगळे दादा, भाऊ, साहेब, भैय्या हे स्वतःच्या भावनेपेक्षा, वैयक्तिक प्रगतीपेक्षा पक्षाच्या विचारधारेला महत्त्व देत होते.आपल्या नेत्यांना जीव की प्राण मानत होते. पक्ष सत्तेत येऊनही कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता ही मंडळी सदैव पक्षाच्या सेवेत तत्पर असायची. बँक खाते झिरो असायची. अनेक पक्ष असे आहे की, जे बरेच वर्षे सत्तेत आले नाही. सत्तेत येईल असे वाटलेही नाही. वर्षानुवर्षे कार्यकर्त्यांना ताटकळत बसावे लागले. तरीही कधीही त्यांच्या डोक्यात सत्तांतर करण्याचा विचार स्वप्नातही आला नाही. सारे अविरत प्रामाणिकपणे पक्षाची सेवा करत राहिले. परंतु अलीकडे मागील काही दिवसांपासून पक्षांतर करण्याची जणू त्सुनामी आली की काय असे चित्र दिसतं आहे. सामान्य माणसे लोकशाहीचे चाललेले हे वस्त्रहरण खुल्या नजरेने पाहत आहेत. लोकशाहीचे चाललेले वस्त्रहरण बघितल्याशिवाय पर्याय नाही. काय करणार सामान्य जनता ?




बिचारी मुकी आहे. ती सगळे बघू शकते. पण काहीही करू शकत नाही. एका स्थितप्रज्ञ नजरेने ती हे सर्व बघत आहे. त्यांनी एखाद्या पक्षाची ध्येयधोरणे पटत नाही. किंवा एखाद्या पक्षाची ध्येय धोरणे पटतात यामुळे आपल्या नेत्याला मोठ्या आशेने लोकप्रतिनिधी म्हणून निवडून पाठविले. आणि हेच लोकप्रतिनिधी निवडून आल्यावर आपल्या मतदारांच्या भावनांची कदर न करता, त्यांच्या स्वप्नांना लाथ मारीत चक्क दुसऱ्या पक्षात निघून जातात. यापेक्षा लोकशाहीची दूसरी विटंबना काय असू शकते.

काही नीतिमत्ता उरली आहे की नाही. ज्या पक्षाने तुम्हाला लहानाचे मोठे केले. कार्यकर्ता म्हणून चेहरा दिला. समाजात ओळख दिली . मानसन्मान दिला. नेता म्हणून नेतृत्व करण्याची संधी दिली. त्याच पक्षाच्या ध्येयधोरणांना लाथ मारून विरोधी विचारांच्या कंपनीमध्ये  जाऊन मांडीला मांडी लावून बसायचे ही कोणती नीती आहे. जर आपल्यामध्ये एवढा दम आहे.विश्वास आहे. ताकद आहे. तर ज्या पक्षातून आपण निवडून आलो त्या पक्षाचा आधी राजीनामा द्या. सामान्य कार्यकर्ता म्हणून दुसऱ्या पक्षामध्ये प्रवेश करा. ज्या मतदारांनी तुम्हाला विश्वासाने ज्या चिन्हावर निवडून दिले. निदान त्या पक्षात पाच वर्षाचा कालावधी तरी प्रामाणिकपणे त्या पक्षाच्या पाठीशी राहा. जर तुम्हाला आहे त्या पक्षाची ध्येयधोरणे काही कारणामुळे पटत नसेल सोडून जायचे असेल तर आहे त्या पदाचा राजीनामा द्या. नंतर कोणत्या पक्षात जायचे तर खुशाल जा. नाहीतर मतदारांनी ज्या विश्वासाने तुम्हाला निवडून दिले आहे त्याच पक्षामध्ये राहा. पण उठसूट आली लहर केला कहर याप्रमाणे आज या पक्षात. उद्या त्या पक्षात. हा पक्षांतर कार्यक्रम लोकभावनेचा अनादर करणारा आहे हे दलबदलुनी लक्षात ठेवले पाहिजे. हे सगळे सामान्य लोकांना धक्कादायक असते. असेच पक्षांतर सत्र कायम सुरू राहिले तर सामान्य नागरिकांनी मतदान करताना काय विचार

करावा. ज्या पक्षाची विचारधारा पटते त्या पक्षाला ते मतदान करतात. त्या व्यक्तीला

निवडून आणतात. पुढे तोच व्यक्ती मतदारांच्या भावना तुडवत वैचारिक भेद असूनही मतदारांच्या भावनेला हादरे देत पक्षांतर करत असेल तर त्या वेदना मतदारांना शब्दात व्यक्त करता येत नाही. जनता मुकी आहे. गरीब आहे. दीन आहे पण दुबळी नाही. ती ज्या दिवशी सबळपणे विचार करेल त्या दिवशी अशा विश्वासघात करून पक्षांतर करणाऱ्यांना लाथाडल्याशिवाय राहणार नाही. म्हणून पक्षांतर करणाऱ्यांनी थोडी ना जनाची तर निदान मनाची लाज ठेवून पक्षांतर केले पाहिजे. लोकशाही आहे. आपण लोकप्रतिनिधी आहोत.

एकदा निवडून दिले. म्हणजे तुम्ही राजे नाही. मालक नाही. वाटेल तसा निर्णय घ्यायला. तुम्ही फक्त लोकप्रतिनिधी आहात. म्हणून मनात येईल तसं वागू नका. वाटेल तेथे पक्षांतर करू ही जर भावना असेल. तर हे लोकशाहीला घातक आहे. लोकप्रतिनिधींनी पथ्य पाळायला पाहिजे. राजकारणातील हा कॅन्सर जवळपास सर्वच राजकीय पक्षांना लागलेला आहे. मतदारांनी अशा दलबदलूंना अद्दल शिकविली नाही तर त्यात एक दिवस सगळे बाधित झाल्याशिवाय राहणार नाही. राजकारण हे समाजसेवेचा एक मार्ग आहे. परंतु ते समर्थपणे केले पाहिजे. ज्या विचाराने आपल्याला मान प्रतिष्ठा सन्मान दिला. तो विचार बाजूला सारून असे अचानक पक्षांतर करून इकडून तिकडे अन तिकडून इकडे उड्या मारत निघून जाणं म्हणजे घरंदाज बाईने परक्याचा हात धरून पळून गेल्यासारखे वाटते. हे जाणे योग्य नाही. त्यामुळे मतदारांची मान खाली जाते. त्यांच्या विश्वासाला कुठेतरी तडा जातो. लोकशाहीशी कुठेतरी प्रतारणा होते. लोकशाहीची प्रतिष्ठा राखायची असेल तर निदान काही गोष्टीची पथ्य निश्चितच पाहिली पाहिजे. जगातील एका मोठ्या देशाच्या लोकशाहीच्या प्रतिष्ठेची किंमत आपण करणार नाही तर कोण करणार?

# आनंदवनाचे भाऊ
# डॉ.विकास बाबा आमटे

**आज तारीख २७ ऑक्टोबर २०२४. डॉ. विकास बाबा आमटे यांचा जन्मदिवस. आज ते वयाची ७७ वर्षे पूर्ण करीत ७८ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. वरोरा येथील महारोगी सेवा समितीचे सचिव असलेल्या डॉ विकासभाऊंनी प्रत्यक्ष कृती आणि उक्तीतून सदैव आनंदवनातील मोठ्या भावाचे कर्तव्ये पार पाडत आपले सामाजिक दायित्व निभावले आहे. आपल्या कार्यकर्तृत्वाने आपल्या व्यक्तित्वाचा परीघ उंचावत त्यांनी 'आनंदवनाचे भाऊ' हे ब्रीद खऱ्या अर्थाने कृतीतून साकारले आहे.**

कामानिमित्ताने अनेकदा बाबांना आनंदवन बाहेर जावे लागत असे. त्यांच्या अनुपस्थितीत डॉ. विकास बाबा आमटे अर्थात भाऊंनी आनंदवन समर्थपणे सांभाळले. आनंदवनवासीयांना बाबांची थोडीही उणीव भासू दिली नाही. कुटुंबात मोठ्या भावाने एकदा मोठेपणाची जबाबदारी स्वीकारली की, त्यांना जबाबदारीने वागावे लागते. त्यातून मागे वळण्याचा अधिकार नसतो. स्वतःची व्यक्तिगत सुखदुःखे बाजूला सारून सार्वजनिक हिताला प्राधान्य देत कार्यरत राहावे लागते. भाऊंनीही महारोगी सेवा समितीच्या कार्याला स्वतःला समर्पित करून अनेकदा स्वतःची व्यक्तिगत सुखदुःखे बाजूला सारत आनंदवनवासियांच्या आयुष्यात चैतन्याचा मळा कसा फुलेल यासाठी अहोरात्र कष्ट घेतले. मोठ्या भावाच्या मायेने जपले. आनंदवनाला कुटुंब मानून ज्येष्ठपणाचे कर्तव्ये सांभाळले. बाबांच्या छत्रछायेखाली राहूनही त्यांनी समाजसेवेच्या क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. बाबा नेहमी म्हणत असत, 'योजना भान ठेवून आखा आणि बेभान होऊन त्यांची अंमलबजावणी करा'. बाबांच्या मनातील मूर्त कल्पनांना सत्यात उतरवण्याचे व वास्तवात आणण्याचे काम डॉ. विकासभाऊंनी केले आहे. बाबांच्या मनातील स्वप्ने प्रत्यक्षात उतरवली आहेत. पण, हे करताना त्यांनी कोणत्याही प्रकारचा बडेजाव मनात आणला नाही हे विशेष. आनंदवनातील सर्वसामान्य कार्यकत्यांच्या खांद्याला खांदा लावून, प्रसंगी हातात कुऱ्हाड – फावडे घेऊन काम केले. स्वतःच्या वर्तणुकीतून कामाला श्रमप्रतिष्ठा मिळवून दिली. हे सर्व करूनही जेव्हा श्रेय घेण्याची वेळ आली. तेव्हा मात्र ते श्रेय त्यांनी सोबतच्या सहकाऱ्यांना व टीमवर्कला दिले. स्वतः मोठेपण घेऊन मिरवण्यापेक्षा इतरांना श्रेय देण्याचा त्यांचा त्यागमयी स्वभाव सामाजिक क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी व प्रेरक आहे. त्यामुळेच खऱ्या अर्थाने ते आनंदवनचे मोठे भाऊ शोभतात. व्यवसायाने डॉक्टर असलेल्या विकासभाऊंनी आनंदवनच्या पडत्या काळात स्वतः ट्रक चालवत हेमलकसा, सोमनाथ येथे आपली सेवा दिली आहे. कधीकाळी कुष्ठरोग हा महारोग समजला जायचा. त्याबद्दल अनेक गैरसमज होते. त्यामुळे हा



आजार झाल्यावर कुटुंब त्या रूग्णाला घरातून बहिष्कृत करायचे. त्यामुळे सामान्यांच्या मनात भीती पसरविणारा कुष्ठरोगी मनाने कुटुंबवत्सल असल्याने मानसिकदृष्ट्या खचून गेलेला असायचा. अशावेळी त्यांचे जगणे दुष्कर होऊन जात. अशा कुष्ठरोग्यांना आनंदवनात मानसिक आधार देण्याचे काम भाऊंनी केले. आनंदवनात आलेल्या दुःखीकष्टी, पीडितांच्या खांद्यावर हात ठेवून त्याला धीर देणारे डॉ. विकासभाऊ बघितले की, घरातल्या कुटुंबवत्सल मोठ्या भावाने लहानांना कसे सांभाळायचे याची प्रचिती येते. स्वतःच्या आचरणातून सामान्य लोकांच्या मनातली कुष्ठरोगबाबतची भीती दूर करून कुष्ठरोगाबाबतचे गैरसमज मिटविण्याचे प्रयत्न भाऊंनी अखंडपणे केले. ज्यांना समाजाने खुजे ठरविले. समाजातून, कुटुंबातून निषिद्ध केले. अशा दुःखी, कष्टी, निराधार आणि परिस्थितीने गांजलेल्या जीवांना त्यांनी आपलेपणाने सांभाळले.

त्यांनी जगासाठी टाकाऊ ठरलेल्या वस्तूंपासून टिकाऊ ठरणाऱ्या सौंदर्यपूर्ण वस्तूंची निर्मिती आनंदवनात केली. सलाईनच्या बाटल्या, एक्स–रे काढलेल्या टाकाऊ फिल्म, गुटख्याची फेकलेली पॉकिटे यापासून शोभेच्या सुंदर वस्तू आनंदवनात नित्यनेमाने तयार करण्यात येत आहेत.

पर्यावरण हा भाऊंचा आवडता विषय. आपल्या आवडीची विविध प्रकारची झाडे लावून आनंदवनात त्यांनी पर्यावरण संतुलित केले आहे. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' मोहिमेला गती दिली. आनंदवनातील तलाव, शेती, बागा यांना हिरवेकंच केले आहे. आज आनंदवनातील पाण्याचा एक थेंबही वाया जात नाही. इतके बारीक आणि सूक्ष्म नियोजन त्यांनी केले आहे. हे सर्व त्यांच्या प्रचंड मेहनतीचे आणि कष्टाचे फळ आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनानेही 'आनंदवन पॅटर्न' महाराष्ट्रात राबविण्याचा प्रयत्न केला होता. भाऊंच्या कुशल मार्गदर्शनातून येथील शेती व्यवस्थापनाला गती मिळाली असून महारोगी सेवा समितीचे सर्व प्रकल्प अन्नधान्यदृष्ट्या स्वावलंबी झाले आहेत. अलीकडे मोठ्या प्रमाणामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. हे बघता आनंदवनातील शेती शेतकऱ्यांना प्रेरणादायी ठरणारा उपक्रम आहे. आनंदवनातील मूकबधिर, कर्णबधिर, अंध, अपंग अशा सर्वांवर अपार माया केली. आनंदवनातील मोठ्या भावाचे कर्तव्ये निभावणारे भाऊ बघितले की, त्यांच्या नावासमोरची 'आनंदवनाचे भाऊ' ही ओळख

खऱ्या अर्थाने सार्थ ठरते. आज भाऊ ७७ वर्षे पूर्ण करून वयाच्या ७८ व्या वर्षाकडे पदार्पण करीत आहेत. त्यांना समाजसेवेसाठी निरोगी व निरामय आरोग्य लाभो हीच सदिच्छा या निमित्ताने व्यक्त करावीशी वाटते.

## वैजापूरमध्ये राजकीय भूकंप
# मा.आ.भाऊसाहेब चिकटगावकर यांचा विद्यमान आ.रमेश पाटील बोरणारे यांना जाहीर पाठिंबा



**वैजापूर । प्रतिनिधी**

२६ ऑक्टोबर रोजी माजी आमदार भाऊसाहेब तात्या चिकटगावकर यांनी विद्यमान आमदार रमेश पाटील बोरणारे यांना शिंदे गटाकडून वैजापूरमध्ये उमेदवारी जाहीर केली. चिकटगावकर यांचा हा निर्णय वैजापूरच्या राजकीय वातावरणात एक महत्त्वाचा बदल घडवून आणतो.

माजी आमदार भाऊसाहेब तात्या चिकटगावकर यांनी अलीकडेच उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला सोडचिट्ठी देऊन त्यांच्यावर अनेक आरोप केले होते. त्यावेळी त्यांना सांगितले गेले होते की उद्धव बाळासाहेब ठाकरे गटात प्रवेश केल्यास त्यांना वैजापूरमध्ये उमेदवारी दिली जाईल; परंतु गटाने भाजपाचे डॉक्टर दिनेश परदेशी यांना उमेदवारी दिली, ज्यामुळे चिकटगावकर



यांना अपक्ष निवडणूक लढवण्याचा विचार करावा लागला.

परंतु आज वैजापूरमध्ये सुरज लॉन्स येथे आयोजित कार्यकर्ता चर्चेत त्यांनी शिंदे गटाचे उमेदवार, विद्यमान आमदार रमेश पाटील बोरणारे यांना जाहीर पाठिंबा दिला. त्यांच्या पुतण्या अभय पाटील चिकटगावकर आणि वैजापूरचे सुप्रसिद्ध डॉक्टर राजीव डोंगरे यांनीही बोरणारे यांना समर्थन दिले.

या निर्णयामुळे शिंदे गटाची ताकद वाढली असून, चिकटगावकर यांचे सर्व कार्यकर्ते शिंदे गटात सामील झाले आहेत, ज्यामुळे आगामी निवडणुकीत गटाला आणखी बलवान बनवण्यात मदत होईल. या घटनेने वैजापूरच्या राजकारणात चांगलीच हलचल निर्माण केली आहे.

# काकासाहेबनगर विद्यालयाचा मैदानी स्पर्धेत घवघवीत यश

**निफाड । प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, काकासाहेबनगर येथील विद्यार्थ्यांनी निफाड तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत घवघवीत यश मिळवले आहे. लासलगाव महाविद्यालयात झालेल्या या स्पर्धेत काकासाहेबनगरच्या खेळाडूंनी विविध वयोगटात उत्कृष्ट कामगिरी बजावली.

१४ वर्षे वयोगटात थाळीफेकमध्ये कु. प्रेम रामदास बोडके याने प्रथम क्रमांक तर कु. ओमकार अनिल कुशारे याने तृतीय क्रमांक पटकावला. १७ वर्षे वयोगटात थाळीफेकमध्ये कु. प्रणव भाऊसाहेब जाधव याने प्रथम क्रमांक मिळवला, तर कु. साहिल योगेश जाधव याने तृतीय क्रमांक मिळवला. १९ वर्षे वयोगटात थाळीफेकमध्ये कु. सुरज ज्ञानेश्वर गायकवाड याने प्रथम क्रमांक मिळवून विद्यालयाचे नाव उज्वल केले. त्याच गटात धावण्याच्या स्पर्धेत कु. शुभम अनिल क्षीरसागर याने २०० मीटरमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच १९ वर्षे वयोगटातील मुलींच्या थाळीफेक स्पर्धेत कु. साक्षी किरण वाघचौरे हिने द्वितीय क्रमांक मिळवला तर कु. ईश्वरी शिवाजी जाधव हिला तृतीय क्रमांक प्राप्त झाला. याच वयोगटातील लांबउडी स्पर्धेत कु. श्रावण जेऊघाले याने तृतीय क्रमांक मिळवला.

सर्व विजयी खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून ते आता निफाड तालुक्याचे प्रतिनिधित्व करतील. या विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडाशिक्षक काळे बी.एन. व कडू बी.व्ही. यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष चांगदेव होळकर, के.के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त अजिंक्य वाघ, शालेय समिती अध्यक्ष रामदास वाढवणे, संचालक केदुनाना बोरगुडे, एस.के. नाठे, सर्व संचालक, प्राचार्य कुशारे जी.ई., व सर्व शिक्षक, शिक्षिका व कर्मचारी यांनी केले असून आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# शिक्षक शिवाजी बिरादार यांचा सेवानिवृत्ती सत्कार संपन्न

**शिरूर । प्रतिनिधी**



शिरूर अनंतपाळ तालुक्यातील येरोळ येथील जिल्हा परिषद प्रशालेतील सहशिक्षक शिवाजी नरसिंगराव बिरादार यांच्या ३४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्ती निमित्त सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. गुरुवारी, २४ ऑक्टोबर रोजी झालेल्या या कार्यक्रमात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

गटविकास अधिकारी बळीराम चव्हाण यांच्या हस्ते शिवाजी बिरादार आणि त्यांच्या पत्नी महानंदा बिरादार यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. शालेय समितीचे अध्यक्ष तानाजी दाडगे महाराज यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभात लातूर एस.एस.सी. बोर्ड सदस्य प्राचार्य रामलिंग मुळे, केंद्र प्रमुख दामाजी बालुरे, मुख्याध्यापक ईश्वर बिराजदार, येरोळ गावाच्या सरपंच सुकुमार लोकरे आणि अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

प्रास्ताविक आम्हीद शेख यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रकाश नागटिळक यांनी केले आणि आभार प्रदर्शन एम.एस. बिरादार यांनी मानले. या कार्यक्रमात शिक्षक, पालक, नातेवाईक, मित्र, ग्रामस्थ, तसेच तळेगाव केंद्रातील मुख्याध्यापक आणि शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# किनकर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सेलू येथे 'गुड टच, बॅड टच' आणि मानसिक आरोग्य कार्यशाळा संपन्न

**सेलू । प्रतिनिधी**

किनकर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सेलू येथे विद्यार्थिनींसाठी 'गुड टच, बॅड टच' आणि मानसिक आरोग्य या महत्त्वपूर्ण विषयांवर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेचे उद्दिष्ट विद्यार्थिनींना शारीरिक स्पर्शासंबंधी जागरूक करणे आणि मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून देणे हे होते.कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे प्राचार्य डॉ. प्रशांत रेवतकर यांच्या हस्ते झाले. मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी विद्यार्थिनींना स्वतःच्या सुरक्षेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन करत शारीरिक आणि मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित केले.




या कार्यशाळेत अर्बन हेल्थ वेलनेस सेंटर, शासकीय रुग्णालय, सेलू येथील तज्ञ डॉ. ऋतुजा गरघाटे, डॉ. कांचन श्रीनाथन, गोपीकिसन सोनटक्के, शुभम निमसडे आणि स्वप्नील पाटील यांनी सहभाग घेतला. डॉ. ऋतुजा गरघाटे यांनी विद्यार्थिनींना 'गुड टच' आणि 'बॅड टच' याविषयी सखोल माहिती देऊन असुरक्षित स्पर्श ओळखण्याचे मार्ग सांगितले. तसेच, शरीरातून मिळणाऱ्या लक्षणांची ओळख करून त्यावर योग्य पावले उचलण्याचे महत्त्व पटवून दिले.डॉ. कांचन श्रीनाथन यांनी मानसिक आरोग्यावर मार्गदर्शन केले. तणाव, चिंता आणि मानसिक अस्वस्थता यावर मात करण्याचे उपाय सांगत मानसिक स्वास्थ्य राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

या कार्यशाळेस विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सर्वांनी चर्चेत आणि मार्गदर्शन सत्रात सक्रिय सहभाग नोंदवला. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी मेघा साळवे, विभागप्रमुख खराबे , संकेत चौधरी, प्रियांका कलंत्री आणि राजू देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आयोजन व आभार प्रदर्शन प्रा. प्राजक्ता देवतारे यांनी केले, तर समारोप प्रा. विनोद सुकंडे यांच्या हस्ते झाला.

# करमाळा–माढा विधानसभा निवडणूक २०२५ प्रशिक्षण संपन्न



**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा–माढा विधानसभा निवडणूक २०२५ अनुषंगाने प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. करमाळा तहसीलदार शिल्पा ठोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले असून यावेळी प्रशिक्षार्थींना निवडणूक प्रक्रियेचे सखोल मार्गदर्शन देण्यात आले.

या शिबिरास जाधवर, मंगवडे, हेळकर यांच्यासह अनेक प्रशिक्षार्थी उपस्थित होते.



**दिवाळीच्या सुट्टया लागल्या, आता फक्त मौज, मस्ती आणि धिंगाणा!!वडाच्या पारंब्याना हातात पकडून झूलण्याचा आनंद काही औरच!!छाया :प्रणय बांगरे.**

# आ.यशवंत माने यांचा पंढरपूर तालुक्यातील गावभेट दौरा रविवारी

**मोहोळ । प्रतिनिधी**

मोहोळ मतदारसंघाचे आमदार यशवंत माने हे रविवार, दिनांक २७ रोजी पंढरपूर तालुक्यातील गावांचा भेट दौरा करणार आहेत. सकाळी ९ वाजता कोंढारकी येथे दौऱ्याची सुरुवात होऊन, त्यानंतर १० वाजता चळे, ११:३० वाजता आंबे, १२ वाजता सरकोली, ४ वाजता ओझेवाडी, ५ वाजता नेपतगाव, आणि सायंकाळी ६ वाजता अंबेचिंचोली येथे ते भेट देणार आहेत.



आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेता आ. माने यांचा हा दौरा महत्त्वपूर्ण मानला जात आहे. महायुतीतील अजित पवार गटाचे उमेदवार असलेल्या माने यांनी गुरुपुष्यांमृत योग साधून आपला उमेदवारी अर्ज नुकताच दाखल केला आहे.

गेल्या पाच वर्षांत आ. माने यांनी मतदारसंघात तीन हजार कोटी रुपयांचा निधी आणून विविध विकासकामे केली आहेत. त्यांच्या निधीतून पंढरपूर तालुक्यातील १७ गावांमध्ये माजी आमदार राजन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ते आणि पाणीपुरवठा यासारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली आहे.

# खेळो इंडिया (मैदानी) प्रशिक्षण केंद्राच्या खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत नागपूर विभागस्तरीय १४, १७, आणि १९ वर्षे वयोगटातील मुला–मुलींच्या शालेय मैदानी क्रीडा स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल, चंद्रपूर येथे नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धेत खेळो इंडिया (मैदानी) प्रशिक्षण केंद्राच्या खेळाडूंनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला आणि उत्कृष्ट कामगिरी बजावत राज्यस्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली.




प्रशिक्षक रोशन भुजाडे यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडू क्रिष्णा रोहणे, सोहम मोरे, अंकित यादव, दर्शन निवाडे, आरुष चव्हाण, युकांत उके, श्रेया ईथापे, किंजल भगत, आणि अंकिता चव्हाण यांनी चमकदार प्रदर्शन केले. त्यांच्या या यशाबद्दल जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, तालुका क्रीडा अधिकारी विनोद ठिकरे आणि थलेटिक्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. दिलीप जयस्वाल व इतर मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले व राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# खासदार अमर काळे यांच्या पत्नीला आर्वी विधानसभा तिकीट; काँग्रेसच्या स्वप्नांवर पाणी

**वर्धा । प्रतिनिधी**

आर्वी विधानसभा मतदारसंघात खासदार अमर काळे यांनी पत्नी मयुरा काळेसाठी उमेदवारी मिळवण्यास यश मिळवले आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाने जाहीर केलेल्या उमेदवारांच्या दुसऱ्या यादीत मयुरा काळे यांचे नाव समाविष्ट करण्यात आले आहे, ज्यामुळे काँग्रेसच्या आर्वी मतदारसंघातील स्वप्नांना मोठा धक्का बसला आहे.

काँग्रेस पक्षाने आर्वी मतदारसंघ आपल्या ताब्यात ठेवावा, असा आग्रह पक्षाच्या नेत्यांनी मुंबई व दिल्लीतील बैठकीत धरला होता. तथापि, मयुरा काळे यांच्या नावावर चर्चा सुरू असताना इच्छुक उमेदवारांनी आक्षेप घेतले. यामध्ये शैलेश अग्रवाल,



बाळा जगताप आणि अनंत मोहोड यांचा समावेश होता. काँग्रेसच्या राष्ट्रीय नेत्यांनी या प्रकरणाबद्दल चिंता व्यक्त करताना राहुल गांधी यांनीही याबाबत प्रश्न उपस्थित केला होता.

आर्वी मतदारसंघात काळे कुटुंबाचे वर्चस्व कायम आहे, त्यामुळे अमर काळे यांनी ही जागा सोडण्यास तयार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. लोकसभा निवडणुकीत काही अटी ठेवून राष्ट्रवादीची उमेदवारी स्वीकारली, तरी पत्नीच्या उमेदवारीचा मुद्दा त्यात समाविष्ट नसल्याचे बोलले जात आहे. आता एकाच कुटुंबात लोकसभा आणि विधानसभेचा झेंडा फडकणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. काँग्रेसने आर्वीची जागा गमावल्यामुळे त्यांच्या स्वप्नांवर पाणी फिरले आहे, त्यामुळे येत्या निवडणुकांमध्ये चुरस वाढण्याची शक्यता आहे.

# माजरी–वरोरा दरम्यान अनोळखी इसमाचा रेल्वे अपघातात मृत्यू

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

माजरी–वरोरा रेल्वे स्टेशनदरम्यान १० ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री ८ च्या सुमारास एक अनोळखी इसम जखमी अवस्थेत रेल्वे गेटजवळ आढळून आला. रेल्वे कर्मचारी व पोलिसांनी तत्काळ त्याला उपचारासाठी वरोरा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी त्याला चंद्रपूरच्या सामान्य रुग्णालयात पाठविले. मात्र, चंद्रपूर येथे नेल्यानंतर त्याला मृत घोषित करण्यात आले.

मृतकाची ओळख अद्याप पटलेली नसून, त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे: अंदाजे वय ५५ ते ६० वर्षे, सडपातळ बांधा, काळे–पांढरे केस, गुलाबी रंगाचा फुलबाह्यांचा शर्ट, काळ्या रंगाची पॅन्ट. सदर इसम ट्रेनमधून प्रवास करत असताना पडलेला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

मृतकाच्या नातेवाईकांनी चंद्रपूर शहर पोलिस स्टेशनशी त्वरीत संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# फुलसावंगी येथील पत्रकारांचा विधानसभेतील उमेदवारांना स्पष्ट संदेश: पत्रकारांचा सन्मान राखल्यासच पाठिंबा

**उमरखेड । प्रतिनिधी**

फुलसावंगी येथील पत्रकारांनी विधानसभेच्या निवडणुकीत योग्य उमेदवाराच्या निवडीसाठी एकत्र येत ठाम भूमिका घेतली आहे. पत्रकारांच्या मते, निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधींनी पत्रकारांचा सन्मान राखला पाहिजे, त्यांच्या मते विचार केला पाहिजे, तसेच त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी कृतिशील राहिले पाहिजे. पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्ष मोहन पांढरे यांनी सांगितले की, समाजातील घडामोडींची अचूक माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी पत्रकार अहोरात्र कार्यरत असतात. समाजप्रबोधन आणि अन्यायाविरोधी लढ्यात पत्रकारांचे योगदान अनमोल असून, त्यांना यासाठी योग्य मान्यता मिळणे आवश्यक आहे.

पत्रकार संघाच्या मतानुसार, फुलसावंगी येथील पत्रकार संघाने निर्णय घेतला आहे की, आगामी निवडणुकीत अशा उमेदवारालाच पाठिंबा दिला जाईल जो पत्रकारांच्या कार्याचे महत्त्व ओळखून त्यांच्या हक्कांचे रक्षण करेल. यावेळी पत्रकार संघाचे सर्व सदस्य उपस्थित होते, ज्यांनी या निर्णयावर आपली एकजूट दर्शवली.



# शिंदे गटात इनकमिंग सुरूच – घोटीतील कार्यकर्त्यांचा एकजूट प्रवेश

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील घोटी येथील असंख्य कार्यकर्त्यांनी शनिवारी, २६ ऑक्टोबर रोजी आमदार संजय शिंदे यांच्या निवासस्थानी शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. या प्रवेशाद्वारे शिंदे गटाची ताकद अधिक वाढली असून तालुक्यातील राजकीय समीकरणे नव्या दिशेने झुकण्याची शक्यता आहे.



प्रवेश सोहळ्याच्या वेळी जनसेवा पार्टी प्रमुख विष्णू ननवरे, ओबीसी नेते धनाजी ननवरे, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ ननवरे, प्रदीप वाघमारे, प्रगतशील बागायतदार दत्तात्रय क्षीरसागर यांच्यासह सागर ननवरे, अनिल राऊत, कुंडलिक ननवरे, आजिनाथ ननवरे, नवनाथ यादव, शिवाजी कानडे, रमेश ननवरे, उमेश ननवरे, संतोष कानडे, गजेंद्र शेंडे, महेश राऊत, भालचंद्र राऊत आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार संजय शिंदे यांच्या हस्ते नव्या कार्यकर्त्यांचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला. यावेळी शिंदे यांनी प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांना भविष्यकाळात न्याय देण्याचे आश्वासन दिले.

घोटीचे सरपंच विलास राऊत यांनी नव्या कार्यकर्त्यांच्या स्वागतासाठी मनोगत व्यक्त करताना, या कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे आमची ताकद वाढल्याची कबुली दिली. तसेच आगामी निवडणुकीत घोटी गावातून आमदार संजय शिंदे यांना सर्वाधिक मतदान मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला माजी जिल्हा परिषद सदस्य उद्धव माळी, कुर्डूचे सरपंच बाळासाहेब जगताप, निंभोरेचे सरपंच रविंद्र वळेकर, बारलोणीचे माजी सरपंच संजय लोंढे, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ आतकर, संतोष नवले, कोर्टीचे नेते सुभाष अभंग, उपळवाटेचे युवा नेते बाळराजे माळी, कन्हेरगावचे धनंजय मोरे, विनायक राऊत, कांतीलाल राऊत, अमोल भोसले, प्रशांत शेंडे, राजेंद्र भोसले, अक्षय खरात यांसह इतर मान्यवर उपस्थित होते.

# वर्धा विधानसभा मतदारसंघात मतदान पथकांचे प्रशिक्षण संपन्न

**वधा । प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर वर्धा विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्राध्यक्ष, पहिला व दुसरा मतदान अधिकारी यांचे प्रशिक्षण २६ व २७ ऑक्टोबर रोजी चरखागृह येथे पार पडले. निवडणूक निर्णय अधिकारी दीपक कारंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान प्रक्रियेचे तपशीलवार मार्गदर्शन देण्यात आले.




प्रशिक्षण दोन सत्रांत आयोजित करण्यात आले होते. पहिल्या सत्रात सकाळी ९.०० ते १२.३० वाजेपर्यंत तर दुसऱ्या सत्रात १.३० ते ५.०० वाजेपर्यंत मतदान प्रक्रियेवरील मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षणात मतदान अधिकार्यांची भूमिका, ईव्हीएम मशीनचे तांत्रिक ज्ञान, तसेच विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये करण्यात आलेल्या नव्या बदलांची सविस्तर माहिती देण्यात आली.

ईव्हीएम मशीन हाताळणीचे तांत्रिक प्रशिक्षण जी. एस. कॉमर्स कॉलेज, वर्धा येथे मास्टर ट्रेनरद्वारे दोन सत्रांत दिले जाणार आहे, ज्यामध्ये मशीनच्या तांत्रिक बाबींवरील अडचणींचे निराकरण करण्यात येणार आहे.

हिंगणघाट विधानसभा मतदारसंघात देखील जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी मतदान कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. हिंगणघाट येथे चार सत्रांमध्ये प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असून, या प्रशिक्षणात ६०५ कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

या सर्वांतून आगामी निवडणूक प्रक्रियेची यशस्वीता साधण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांना योग्य मार्गदर्शन देण्यात आले आहे.

# मतदार जागृतीचा उपक्रम राबविण्यात रायगावची पं.ज.नेहरु शाळेचा अनोखा उपक्रम

**सोलापूर | प्रतिनिधी**

भारतीय निवडणूक आयोगाच्या स्वीप उपक्रमांतर्गत पंडीत जवाहरलाल नेहरू विद्यालय रावगाव (ता. करमाळा) येथे नोव्हेबर महिन्यात होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लोकांनी शंभर टक्के मतदान करून देशाचे जागरूक नागरिक व्हावे यासाठी दोन दिवस 'मतदान जनजागृती अभियाना'चे आयोजन केले आहे.

यामध्ये मतदार जनजागृती रॅली, रांगोळी स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, निंबध लेखन तसेच चित्रकला ई स्पर्धांचा समावेश आहे.

पहिल्या दिवशी शुक्रवार (ता २५) प्रशालेमध्ये मतदार जनजागृती प्रभात फेरी तसेच रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. प्रभात फेरी दरम्यान मतदार जागृतीसाठी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे फलक हातात घेऊन मतदान करण्यासाठी पालकांना प्रोत्साहन दिले. यामध्ये लोकशाहीचे एकच अधिष्ठान, करा आपले मतदान. जागरूक मतदार, लोकशाहीचा आधार. जागरूक नागरिक होऊया, अभिमानाने मत देऊया, चला मतदान करूया, लोकशाही वाचवू या आदी घोषणा देत त्याच बरोबर इयत्ता सातवी ते दहावीच्या मुलींनी रांगोळी स्पर्धेमध्ये सहभागी होऊन मतदार जनजागृती अभियान राबविले.

तसेच दुसऱ्या दिवशी शनिवार (ता २६) इयत्ता ७ वी ते १० वी पर्यंत दोन गटामध्ये निबंध लेखन, वक्तृत्व स्पर्धा, आणि चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये इ.७ वी ते ८ वी लहान गटातून भारतीय संविधान व लोकशाही या विषयावर निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक कु.देवयानी सचिन शेळके, इ ९ वी ते १० वी मोठया गटात कु. श्रावणी राजेंद्र गुरव यांनी संपादन केला. तसेच वक्तृत्व स्पर्धेत छोटया गटामध्ये मतदार राजा जागा हो या विषयावर प्रथम क्रमांक कु. तनुजा भुजबळ तर मोठ्या गटामध्ये कु.श्वेता शेळके हिने प्रथम क्रमांक संपादन केला. आणि त्याचबरोबर चित्रकला स्पर्धेत इ.७ वी ते ८ वी लहान गटातून मतदान जनजागृती करताना युवक/युवती या विषयावर कु. प्रेरणा प्रवीण कांबळे तसेच मोठ्या गटामध्ये प्रथम क्रमांक चि.शिवम पवार याने पटकावला.

शालेय स्तरावरील या सर्व स्पर्धांचे दोन्ही गटांतील प्रथम क्रमांकांची नावे तालुका स्तरावर पाठविण्यात आली.

या सर्व स्पर्धांच्या आयोजनासाठी मुख्याध्यापक विजयराव कोळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली भाऊसाहेब सरडे , हनुमंत रासकर, प्रताप बरडे , अंजली लांडगे , पप्पु राठोड सर, सुहास कानगुडे व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.




# कोणी घर देते का घर...! हिंगणघाटातील वयोवृद्धाची हाक

**हिंगणघाट | प्रतिनिधी**

शीतला माता मंदिर मार्गावर जलाराम वाटिकेसमोर एक ७५ वर्षीय वृद्ध आपल्या जिवाभावाच्या निवाऱ्याच्या शोधात आहे. वयोवृद्ध वसंत पंढरी सूत्रावे यांची झोपडी आता अत्यंत जीर्णावस्थेत असून, कोणत्याही क्षणी ती कोसळण्याची भीती आहे. शेजाऱ्याने सहानुभूतीने तात्पुरता आश्रय दिला असला, तरी या वृद्ध व्यक्तीला स्थायी निवाऱ्याची आवश्यकता आहे.

वसंत सूत्रावे हे मूळ बल्लारपूर येथील असून, जवळपास पंधरा वर्षांपूर्वी हिंगणघाटमध्ये आले. सुरुवातीच्या काळात त्यांचा एक छोटा व्यवसाय होता, ज्यातून ते उपजीविका चालवीत होते. पण परिस्थितीने पाठ फिरवली आणि व्यवसाय बंद पडला. त्यामुळे त्यांनी मजुरी करून संसार चालवण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या जीवनात आणखी एक दुःखद प्रसंग घडला - त्यांच्या अर्धांगिनीचे निधन झाले. त्यानंतर त्यांनी एकुलत्या मुलासह गाव सोडले.



वृद्धापकाळामुळे आता त्यांना काम मिळणे कठीण झाले आहे. त्यांचा एकुलता मुलगाही, जो ४० वर्षांचा आहे, सध्या बेरोजगार आहे. दोघांनी मिळेल त्या छोट्या-मोठ्या कामांतून पोट भरण्याचा प्रयत्न केला, परंतु आता या परिस्थितीत काहीही शक्य नसल्याने दोघेही निराधार अवस्थेत जीवन जगत आहेत.

वसंत सूत्रावे यांनी पंधरा वर्षांपूर्वी उभारलेली झोपडी आता काळाच्या ओघात पूर्णतः जीर्णावस्थेत पोहोचली आहे. वादळ, पाऊस, ऊन यापासून बचाव करण्यासाठी तात्पुरत्या आश्रयाची व्यवस्था करून दिलेली असली, तरी ती त्यांना पुरेशी ठरत नाही. अशा असुरक्षित वातावरणात वसंत सूत्रावे हे आपल्या मुलासह प्रत्येक क्षण जगत आहेत.

या वयोवृद्ध बाप-लेकांच्या कठीण परिस्थितीवर सहानुभूती दाखवत स्थानिक लोकांनी तात्पुरता आधार दिला आहे. मात्र, त्यांना आवश्यक आहे एक सुरक्षित आणि स्थायी निवारा, जिथे ते निश्चिंतपणे राहू शकतील. वसंत सूत्रावे यांची एकच विनंती आहे - डोक्यावर एक सुरक्षित छप्पर.

अनाथत्वाच्या सावटात व असुरक्षित वातावरणात जीवन जगत असलेल्या वसंत सूत्रावे यांना वादळ, वारा, पाऊस व ऊन यापासून संरक्षण मिळवण्यासाठी मदतीची गरज आहे. स्थानिक प्रशासन, सामाजिक संघटना आणि दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन त्यांच्या जीवनात थोडासा प्रकाश आणण्याची हीच वेळ आहे, असे ते विनवणी करतात

## जो हिंदुहित की बात करेगा, वही मलकापूर नांदुरा मतदारसंघ पर राज करेगा

# ओम शिंदे यांचे आवाहन ;हजारो युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मलकापूर | प्रतिनिधी**

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान मलकापूर विभागाचे प्रमुख ओम शिंदे यांनी दिलेल्या आवाहनाला मलकापूर व नांदुरा मतदारसंघातील युवकांचा जोरदार प्रतिसाद मिळाला आहे. जो हिंदुहित की बात करेगा, वही मलकापूर - नांदुरा मतदारसंघ पर राज करेगा असे ओम शिंदे यांनी आवाहन केले असून, सोशल मीडियावर हजारो युवकांनी स्टेटस ठेवून या आवाहनाला पाठिंबा दर्शविला आहे.

ओम शिंदे यांनी मतदारसंघात अपुरा विकास, वाढती गुन्हेगारी, बेरोजगारी आणि हिंदू समाजाच्या समस्या या मुद्द्यांवर आवाज उठवला आहे. त्यांच्या मते, निवडणुकीच्या काळात लोकप्रतिनिधी पैसे वाटप आणि दारू पाजण्यासारख्या कृती करतात; परंतु विकासासाठी कोणतीही ठोस पावले उचलत नाहीत. खामगावच्या तुलनेत मलकापूर शहराचा विकास मागासलेला आहे, असेही शिंदे यांनी सांगितले.

शहरातील हिंदुत्ववादी तरुणांची गळचेपी होत असल्याचा आरोप करून, ओम शिंदे यांनी सांगितले की, मतांवर निवडून आलेले राजकीय नेते हिंदूंच्या बाजूने उभे राहत नाहीत. त्यामुळे यंदाच्या विधानसभा निवडणुकीत जो हिंदुहिताला प्राधान्य देईल, त्यालाच मतदान करण्याचे संकेत हिंदू बांधवांनी दिले आहेत.

शिंदे यांच्या आवाहनानंतर युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, हिंदू समाजाच्या न्यायासाठी एकत्र येण्याची तयारी त्यांनी दर्शवली आहे.

# हिंगणी ग्रामपंचायतीचा फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प

**सेल | प्रतिनिधी**

हिंगणी ग्रामपंचायतीने यंदा फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचा संकल्प घेतला आहे. वातावरणातील प्रदूषण, आवाज प्रदूषण आणि अनावश्यक आर्थिक खर्च टाळण्याच्या उद्देशाने हा निर्णय ११ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या ग्रामसभेत चर्चिला गेला, ज्यामध्ये सर्व सदस्यांनी या संकल्पाला सहमती दर्शवली.

हिंगणी ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात वानर विहरा, धामणगाव आणि देवखळ या गावांचा समावेश आहे. या गावांमध्ये महिला नेतृत्व असल्याने, ग्रामस्थांनी प्रदूषण टाळण्याचा संकल्प महत्त्वाचा मानला आहे. सरपंच दामिनी देकाटे यांच्या नेतृत्वाखाली या निर्णयाचे जोरदार समर्थन करण्यात आले आहे, ज्यामुळे ग्रामस्थांनी उत्साहाने याला मान्यता दिली.

ग्रामस्थांचा असा विश्वास आहे की, या निर्णयामुळे प्रदूषण कमी होईल आणि अनावश्यक खर्चावर आळा बसेल. हिंगणी ग्रामपंचायतीने प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्यासाठी पुढाकार घेणारी पहिली ग्रामपंचायती ठरण्याची शक्यता आहे.


आता ग्रामस्थांना हा संकल्प कितपत राबवता येतो, हे महत्त्वाचे ठरेल. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याच्या या उपक्रमामुळे सामाजिक एकता व पर्यावरण संरक्षणाच्या बाबतीत सकारात्मक बदल घडवण्याची अपेक्षा आहे.

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांची अकोले येथे स्ट्राँगरूमची पहाणी

**अकोले | प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आणि पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी अकोले येथील शासकीय धान्य गोदाम (जुने) येथे स्थापन केलेल्या स्ट्रॉगरूमला भेट देऊन तेथील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला.

यावेळी मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था,ईव्हीएम यंत्राचे वाटप व मत मोजणीच्या दिवशी जागेचे नियोजन याविषयी जिल्हाधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती घेतली. प्रशासनाच्या सर्व विभागांच्या निवडणूकविषयक तयारीचा आढावा व कामकाजाची पाहणी करून निवडणूक आचारसंहितेच्यादृष्टीने त्यांनी सूचना दिल्या. निवडणूक आयोगाच्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.



पोलिस अधीक्षक ओला यांनी ईव्हीएम सुरक्षिततेच्या दृष्टीने स्ट्रॉगरूमचे ठिकाण व परिसराची पाहणी केली. यावेळी अकोले विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनुपसिंह यादव, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सिद्धार्थ मोरे, पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, गटविकास अधिकारी विकास चौरे, नगरपंचायत मुख्याधिकारी पंकज गोसावी, निवासी नायब तहसीलदार किसान लोहारे, महसूल नायब तहसीलदार प्रमोद सावंत , मंगेश फापाळे आदी उपस्थित होते.

# महसूल कर्मचारी व पोलीस अधिकारी निवडणूक कामात व्यस्त

## गोंडगाव व जायकवाडीतील अवैध वाळू व मुरूम चोरीच्या घटना चाल

**पाथरी | लक्ष्मण उजगर**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पाथरी उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय आणि पोलीस प्रशासन कार्यरत असून, त्यांच्या व्यस्ततेचा फायदा घेत तालुक्यात रात्रीच्या वेळी अवैध वाळू उपसा आणि मुरुमाचे उत्खनन चालू आहे. गोंडगाव येथून अवैध वाळू उपसा वाहतूक तर जायकवाडीच्या डाव्या कालव्यावरील मुरुमाचे उत्खनन चोरट्या मार्गाने सुरू असल्याचे समोर आले आहे.

एकीकडे विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू असताना, प्रशासनाच्या या व्यस्ततेचा फायदा घेत वाळूमाफिया आणि मुरूम माफिया अवैधपणे काम करत आहेत. रात्रीच्या काळात हा व्यवसाय विशेषतः चालू असून, यामुळे शासनाला लाखो रुपयांचा महसूल गमवावा लागत आहे.

या घटनांवर प्रशासनाने लक्ष देण्याची



आवश्यकता आहे. अवैध वाळू उपसा आणि मुरूम उत्खननाच्या प्रकरणांमध्ये संबंधित माफियाविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

याबाबत स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमी यांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने अविलंब यावर लक्ष देऊन योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे, अन्यथा या अवैध कृत्यांमुळे भविष्यकाळात गंभीर पर्यावरणीय समस्या निर्माण होऊ शकतात.

# सोयाबीन पिकाची कापणी व मळणी करतांना योग्य व्यवस्थापन करा

## कृषी विभागाचे शेतक-यांना आवाहन

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

सोयाबीन पिकाची काढणी व मळणीची कामे जवळपास ८० ते ८५ टक्के पूर्ण झाली असून बहुतांश शेतकऱ्यांनी सोयाबीन विक्रीस सुरुवात केली आहे. सोयाबीनचे बहुतेक वाण आता शेंगा फुटण्यास प्रतिरोधक असले तरी, काही जातींमध्ये शेंगा फुटण्याचे नुकसान वाढले आहे. कापणी नंतरचे व्यवस्थापन म्हणजे शेल्फ लाइफ, ताजेपणा आणि आकर्षक स्वरुप वाढविण्यासाठी कापणीनंतर कृषी उत्पादनांची हाताळणी, कापणी, मळणी, पॅकेजिंग, साठवण आणि वाहतूक इ. दरम्यान कापणीनंतरच्या चुकीच्या व्यवस्थापनामुळे सुमारे ९ ते १० टक्के धान्य वाया जाते. कापणीनंतरचे योग्य वैज्ञानिक व्यवस्थापन हे नुकसान कमी करु शकते. कापणीनंरतरच्या व्यवस्थापनाप्रमाणेच योग्य कापणीच्या साधनांचा वापर आणि योग्य कापणीपूर्व उपायोजनांमुळे धान्याची साठवणूक आयुष्य सुधारते आणि कापणीनंतरचे नुकसान मोठ्या प्रमाणात कमी करता येते. शेतकऱ्यांनी सद्याच्या परिस्थितीत सोयाबीन पिकाची कापणी व मळणी करतांना खालीलप्रमाणे निर्देशांचा अवलंब केल्यास धान्याची प्रत चांगली राहून योग्य बाजारभाव मिळू शकतो.

१. कापणी झालेल्या परंतु पावसाच्या हवामानामूळे मळणी न झालेल्या सोयाबीनचे एकत्र ढीग किंवा गंजी करून ठेवण्यात आलेल्या सोयाबीनची मळणी करतांना सर्वप्रथम गंजी मोकळी करा. तसेच गंजी कोरडया जागेवर सुकवणीस पसरावे व काडाची उलथापलट करत राहावी. काड व दान्यातील आर्द्रता कमी झाल्याची खात्री करुनच मळणीबाबत निर्णय घ्यावा. २. ज्या ठिकाणी सोयाबीनची कापणी झालेली नाही अशा ठिकाणी कापणी करतांना स्वच्छ हवामान पाहून ९० टक्के शेंगा वाळल्यानंतर बियाण्यातील ओलावा १७ ते २० टक्के असताना पिकांच्या कापणीला सुरवात करावी. ३. पेरणी केलेल्या आणि उशिरा पक्व होणाऱ्या वाणांसाठी देखील शेंगांचा रंगात बदलानुसार पिकाची कापणी करावी. ४. शेंगा पिवळया असताना कापणी केलेले उत्पादन ताबडतोब उन्हात वाळवावे व त्याची मळणी करावी. ५. परिपक्वतेच्या वेळी पावसामुळे शेंगा दाणे फुटल्याने होणारे नुकसान टाळण्यासाठी आणि दर्जेदार मळणीसाठी कापणी केलेले पीक योग्य प्रकारे वाळवावे.

६. कापणी करतांना झाड उपटून येणार नाही याची काळजी घ्यावी. झाड उपटून आलेच तर मुळांना लागलेली माती झटकून घ्यावी, माती मुळांना लागून मळणी करताना मिसळली जाते आणि गुणवत्ता ढासळते. ७. वेळेवर कापणी केल्यास मळणीमध्ये बियांचे नुकसान होत नाही. पिकाची काढणी करताना धारदार विळा किंवा कोयत्याचा वापर करावा. ८. काढणीनंतर सोयाबीनचे एकत्र ढीग किंवा गंजी करुन ठेवू नये. यामुळे त्यास बुरशी लागून धान्याची प्रत खालावते. ९. काढणी केलेले पीक उन्हामध्ये चांगले वाळवावे. मळणीसाठी उशीर होणार असेल तरच वाळलेल्या सोयाबीनची गंजी करून ठेवता येईल. पावसाचे वातावरण असल्यास सर्व शेतमाल एकत्र करून मोठी गंजी लावून झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. १०. मळणी केलेले धान्य स्पायरल सेपरेटर किंवा धान्य स्वच्छता केंद्रावर प्रतवारी करुन घ्यावी. योग्य दर्जाच्या प्रतवारी केलेल्या धान्यास प्रति क्विंटल २०० ते ५०० रु. अतिरिक्त दर मिळतो.

वरीलप्रमाणे सोयाबीन विक्री करीत असतांना खबरदारी घेतल्यास आधारभूत खरेदी केंद्रावर विक्री करण्यास अडचण निर्माण होत नाही व शेतकऱ्यांचे श्रम व पैसा वाया जाणार नाही, असे आवाहन कृषी विभाग तथा जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# गंगापुर तहसील कार्यालयात तहसीलदार नसल्याने शेतकरी कृती समितीने खुर्चीला दिले निवेदन



**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे न झाल्यामुळे शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्यास विलंब होत आहे. यासाठी गंगापुर तालुक्यातील शेतकरी कृती समितीच्या वतीने इंजी. महेशभाई गुजर, राहुल ढोले, आण्णासाहेब जाधव यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार यांच्या खुर्चीला निवेदन देण्यात आले.

जून-जुलै २०२४ दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शासनाच्या निकषानुसार २४ तासात ६५ मिमी पेक्षा जास्त पावसाची नोंद झाल्यास व ३३% पेक्षा जास्त नुकसान झाल्यास पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळावी असा नियम आहे. मात्र, गंगापूर तालुक्यातील पावसाचे पंचनामे अद्याप न झाल्याने शेतकरी नुकसानभरपाईपासून वंचित राहिले आहेत.तसेच ऑगस्ट महिन्यातही तालुक्यात ढगफुटी, अतिवृष्टी, घरांचे नुकसान, जनावरांचे मृत्यू या प्रकारची हानी झाली असून, त्याचे पंचनामे करण्याचे आदेश आजतागायत जारी झालेले नाहीत.

डोणगाव मंडळातील महावेध स्वयंचलित पर्जन्यमान यंत्रे कार्यरत नसल्याने या मंडळातील पर्जन्यमान नोंदविण्याचे अडथळे आले आहेत. त्यासाठी डोणगाव मंडळाच्या जागेवर इतर मंडळाचे पर्जन्यमान सरासरीवर आधारित नुकसान भरपाईसाठी प्रस्ताव पाठवावा, अशी शेतकरी कृती समितीची मागणी आहे. तसेच नव्याने जामगाव मंडळात स्वयंचलित पर्जन्यमान यंत्र बसवून त्याचे अहवाल सार्वजनिक करण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती करण्यात आली.वरील सर्व मागण्यांच्या पूर्ततेसाठी सात दिवसांत संयुक्त पंचनामे करून जिल्हाधिकाऱ्यांकडे नुकसानभरपाईचा अहवाल सादर करावा, अशी मागणी शेतकरी कृती समितीने केली आहे.

# माजी सैनिकांच्या / विधवांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती;१५ नोव्हेंबर पर्यंत अर्ज करण्याची मुदत

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेत किमान ६० टक्के गुणांनी उत्तीर्ण झालेल्या माजी सैनिक, विधवा यांच्या पाल्यांना पुढील शिक्षणासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून शिष्यवृत्ती देण्यात येते. यासाठी इच्छुक व पात्र असणाऱ्या माजी सैनिक/ माजी सैनिक विधवा यांच्या पाल्यांनी १५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

लाभार्थीचा अर्ज, शिष्यवृत्ती फॉर्म, ओळखपत्राची छायांकित प्रत, बोनाफाईड प्रमाणपत्र, उत्तीर्ण झालेल्या वर्गाची गुणपत्रिकेची झेरॉक्स व इतर कुठल्याही योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती मिळत नसल्याचे प्रमाणपत्र इत्यादि कागदपत्र अर्जासोबत जोडावेत. ज्या माजी सैनिकांच्या पाल्यांना पंतप्रधान शिष्यवृत्ती अंतर्गत शिष्यवृत्ती मिळवायची आहे, अशा पाल्यांना जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाची शिष्यवृत्ती लागू होत नाही. ज्या पाल्यांनी सीईटी, जेईई किंवा इतर कारणासाठी गॅप घेऊन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतलेला आहे, अशा विद्यार्थ्यांनी प्रकरणासोबत गॅप सर्टिफिकेट जोडावे.अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, रूम नंबर ३, चंद्रपूर येथे संपर्क साधावा, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी कळविले आहे

# प्रधानमंत्री शिष्यवृत्ती योजनेकरीता ३० नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील माजी सैनिक /विधवांच्या पाल्यांनी वर्ग १२ वी मध्ये ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त करून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी कोणत्याही व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असल्यास सदर विद्यार्थी प्रधानमंत्री शिष्यवृत्ती योजनेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यास पात्र आहेत.

त्याकरिता ऑनलाईन अर्ज www.ksb.gov.in या वेबसाईटवर असून अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर २०२४ आहे. तरी मुळ कागदपत्रे/ प्रमाणपत्रे स्कॅन करून प्रधानमंत्री शिष्यवृत्ती योजनेच्या अर्जासह अपलोड करावे. अपूर्ण किंवा चूकीचा अर्ज भरलेला असल्यास नाकारल्या जाईल. तरी सर्व संबंधित माजी सैनिक/ विधवांनी आपापल्या पात्र पाल्यांचे ऑनलाईन अर्ज ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत भरावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे

# प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धेत ८१३ विद्यार्थ्यांचा सहभाग

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यतील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत देवई, बोर्डा, जिवती, आणि देवाडा या केंद्राच्या स्पर्धेत एकूण ८१३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाटन प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांच्या हस्ते करण्यात आले.


सदर स्पर्धेत थाळीफेक, गोळाफेक, १०० मीटर रिले, ४०० मीटर रिले, लांब उडी , उंच उडी, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल आणि हँडबॉल अशा विविध खेळांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी या खेळांमध्ये जोमाने सहभाग घेतला, आणि त्यांच्या क्रीडा कौशल्यांचा उत्कृष्ट आविष्कार केला. या स्पधेत एकूण ८१३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला यामध्ये देवई केंद्रातून ९६ मुले आणि ८० मुली, बोर्डा केंद्रातून १०७ मुले आणि १२८ मुली, जिवती केंद्रातून ९४ मुले आणि ८९ मुली, तर देवाडा केंद्रातून १२१ मुले आणि ९८ मुली असे एकूण ४१८ मुले आणि ३९५ मुलींचा सहभाग होता. देवाडा केंद्राच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत, विविध खेळांमध्ये आपले वर्चस्व सिध्द केले. त्यांचे खेळाडू विशेषत: कबड्डी आणि थाळीफेक या खेळांमध्ये चमकले.

यावेळी प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार यांनी या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांनी देवाडा केंद्राच्या विशेष कामगिरीचा उल्लेख करत ते म्हणाले, विद्यार्थ्यांमध्ये असलेली क्रीडा कौशल्ये आणि त्यांचा खेळातील उत्साह पाहून अतिशय अभिमान वाटतो. या प्रकल्पस्तरीय स्पर्धेत विद्यार्थ्यांनी जे प्रदर्शन केले आहे, ते भविष्यातील त्यांच्या यशाचा पाया ठरेल. त्यांनी दाखवलेला आत्मविश्वास आणि खेळातील निपुणता हे राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्पर्धामध्येही यशस्वी होण्यासाठी त्यांना मदत करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# गोविंदपूर येथे महर्षी वाल्मिक ऋषी जयंती उत्साहात साजरी

**तळोधी (बा)। प्रतिनिधी**

गोविंदपूर येथे ढीवर समाजाच्या वतीने महर्षी वाल्मिक ऋषी यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी, सजवलेल्या वाहनावर महर्षी वाल्मिक ऋषी यांची पालखी आणि लव-कुश यांची झाकी घेऊन गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत वारकरी भजन मंडळासह समाजातील महिला, पुरुष, तरुण-तरुणी, आणि बालक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



कार्यक्रमाची सुरुवात ह.भ.प. आकाश बांगरे महाराज यांच्या हस्ते महर्षी वाल्मिक ऋषी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. अध्यक्ष म्हणून पोलीस पाटील शिलाताई नेवारे यांनी कार्यक्रमाचे नेतृत्व केले, तर सरपंच शालूताई हांडेकर, अरुण पुस्तोडे, तंमुस अध्यक्ष, संजय मारभते, सचिव मत्स्यपालन संस्था, सुरेश मेश्राम, प्रेमदास ठाकरे, माजी सरपंच मांगरूड, यांसारखे मान्यवर अतिथी म्हणून उपस्थित होते.

ह.भ.प. आकाश बांगरे महाराज यांनी आपल्या मार्गदर्शनातून रामायणातील आदर्शांचा उल्लेख केला. ते म्हणाले, ज्याप्रमाणे वाल्मिक ऋषींनी रामायणातून आदर्श भाऊ, मुलगा, पती, राजा आणि पुरुषाचे आदर्श रूप समाजाला दिले, त्याचप्रमाणे आपण सर्वांनी दुर्गुण, मतभेद आणि वाईट व्यसनांचा त्याग करून शिक्षणाच्या मार्गाने देश, धर्म आणि समाजासाठी योगदान द्यावे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोपाल खामदेवे यांनी केले, सूत्रसंचालन विजय मेश्राम यांनी केले तर आभार घातुजी शेंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दिवाकर मेश्राम, प्रेमदास सामूसाकडे, संजय कामडी, रामदास साहारे, प्रवीण मेश्राम, अनिल कामडी, ताराचंद शेंडे आणि ढीवर समाजाच्या बांधवांनी विशेष परिश्रम घेतले.

# माथेरानमधील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे सामूहिक राजीनामे नामंजूर

**कर्जत । प्रतिनिधी**

माथेरान येथील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामा दिल्याची घोषणा काल कर्जत येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली होती. नगरसेवक प्रसाद सावंत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्थानिक पातळीवर विविध कारणांसाठी आपले पद सोडण्याची तयारी दर्शवली होती. तथापि, शिवसेना प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी तातडीने दखल घेत, सर्व राजीनामे नामंजूर केले आहेत.



प्रसाद सावंत यांनी माथेरान नगरपालिकेवर शिवसेनेची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी केलेले प्रयत्न आणि त्यांची स्थानिक पातळीवरील कामगिरी लक्षात घेऊन उद्धव ठाकरे यांनी त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मुंबई येथील मातोश्रीवर बोलावले. मातोश्रीवर झालेल्या बैठकीत ठाकरे यांनी प्रसाद सावंत यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांना आगामी निवडणुकीसाठी कार्यरत राहण्याचे आदेश दिले.

या बैठकीत आदित्य ठाकरे, किशोरी पेडणेकर, संजय राऊत यांसह शिवसेनेचे अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते. यावेळी आदित्य ठाकरे यांनी प्रसाद सावंत यांच्यावर शिवसेनेचा संपूर्ण विश्वास असल्याचे सांगितले आणि त्यांना 'हक्काची व्यक्ती' म्हणून गौरविले. त्यांनी सावंत यांच्या कार्यप्रणालीबद्दल समाधान व्यक्त करत, त्यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना माथेरानमध्ये आणखी प्रगती करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

शिवसेनेच्या या निर्णयामुळे माथेरानमधील कार्यकर्त्यांना नवीन उभारी मिळाली असून, आगामी निवडणुकीत अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

# पर्यावरणपूरक फटाकेमुक्त दिवाळी साजरी करा-सुधाकर काशीद यांचे आवाहन

**मोहोळ । प्रतिनिधी**

भारतामध्ये दिवाळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो, मात्र फटाके उडवल्यामुळे हवेचे व ध्वनी प्रदूषण वाढत आहे. हे प्रदूषण रोखण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने विद्यार्थ्यांकडून फटाके न फोडण्याचा संकल्प करण्याचे आवाहन करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा कार्याध्यक्ष धर्मराज चवरे आणि राज्य सरचिटणीस सुधाकर काशीद यांनी दिली.




तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक, आणि उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी या फटाकेविरोधी अभियानात सहभागी होणार असून, मागील चार-पाच वर्षांपासून शाळा व शिक्षक या अभियानात सहभागी आहेत. फटाक्यांवर खर्च न करता त्यातून वाचवलेल्या पैशांचा उपयोग शालेय साहित्य, पुस्तके, आणि विज्ञान खेळणी खरेदीसाठी करण्याचे संकल्प विद्यार्थ्यांनी केले आहेत.

सुधाकर काशीद यांनी सांगितले की, फटाके फोडल्याने विद्यार्थ्यांच्या भाजणे, आग लागणे, रक्तदाब वाढणे, मानसिक ताण, श्रवणदोष, आम्लपित्त, फुफ्फुसाचे व श्वसनाचे आजार उद्भवू शकतात. याशिवाय फटाके फोडल्यामुळे वातावरणात विषारी कार्बन मोनॉक्साईड, सल्फर डाय ऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड, कार्बन डाय ऑक्साईड, मॅग्नेशियम, पोटॅशियम यांसारख्या घातक घटकांचे प्रमाण वाढते, ज्यामुळे मानव आणि पर्यावरणावर विपरीत परिणाम होतो.

मोहोळ अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष श्रीधर उन्हाळे, रमेश आदलिंगे, संजय भोसले, रमेश दास, मोहन व्यवहारे, ओम कळसे, आणि मनोहर गोडसे यांनी या अभियानात सहभागी होत विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले आहे.

# दवणगाव येथील देवदत्त डेअरीच्या अध्यक्षांचा शेतकऱ्यांकडून सत्कार



**राहुरी । प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील दवणगाव येथील देवदत्त डेअरीने दूध उत्पादक शेतकऱ्यांना वेळेत पेमेंट देत आणि ५० पैसे प्रति लिटर रिबेट देऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. या कार्याबद्दल देवदत्त डेअरीचे चेअरमन कांतिलाल पाटील होन आणि व्हा. चेअरमन दत्तात्रय पाटील खपके यांचा शेतकऱ्यांकडून विशेष सत्कार करण्यात आला.

दवणगाव परिसरातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना वेळेवर आणि योग्य दराने पेमेंट मिळाल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. डेअरीच्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य राखले गेले आहे.

# लोकनेते परिवारात विविध पक्षांतून जोरदार पक्षप्रवेश; बाळराजे व अजिंक्यराणा पाटील यांच्या नेतृत्वाची भुरळ

**मोहोळ । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोहोळ तालुक्यात अजित पवार गटाचे माजी आमदार राजन पाटील व त्यांच्या दोन्ही मुलं, बाळराजे पाटील आणि अजिंक्यराणा पाटील यांच्या नेतृत्वाखाली लोकनेते परिवारामध्ये विविध पक्षांतील नेते, कार्यकर्ते आणि विविध समाज घटकांचा पक्षप्रवेश जोरात सुरू आहे.



मोहोळ येथील युवा उद्योजक प्रशांत गाढवे व सुनिल गाढवे यांनी शेकडो समर्थकांसह ढोल-ताशांच्या गजरात मोहोळ ते अनगर अशी रॅली काढत महाराष्ट्र राज्य सहकारी परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील, लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील, आणि सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांच्या नेतृत्वाखाली लोकनेते परिवारात प्रवेश केला. यावेळी विद्यमान आमदार आणि विधानसभेचे उमेदवार यशवंत माने प्रमुख उपस्थित होते.

कामती येथील सरपंच प्रविण भोसले, माजी सरपंच गौरव खराडे, किरण सपाटे यांच्यासह दलित चळवळीतील शेकडो कार्यकर्त्यांनीही लोकनेते परिवारात प्रवेश केला आहे. त्यामुळे तालुक्यात लोकनेते परिवाराचे वजन वाढले असून, या प्रवेशामुळे यशवंत माने यांना सर्व समाज बांधवांचा मोठा पाठिंबा मिळणार आहे.

प्रवेशानंतर प्रशांत गाढवे, सुनिल गाढवे, प्रविण भोसले यांनी आगामी निवडणुकीत लोकनेते परिवाराच्या उमेदवाराच्या विजयासाठी मतांमध्ये रुपांतरण करणार असल्याचे सांगितले. माजी आमदार राजन पाटील यांनी सर्वांचे स्वागत करून येणाऱ्या काळात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची ग्वाही दिली

# निलंगा विधानसभा मतदारसंघातून परिवर्तन महाशक्तीची लक्ष्मण वंगे यांना उमेदवारी जाहीर

**शिरूर अनंतपाळ । प्रतिनिधी**

शेतकरी चळवळीत सक्रिय भूमिका बजावणारे आणि तात्विक नेते लक्ष्मण वंगे यांना निलंगा विधानसभा मतदारसंघातून परिवर्तन महाशक्तीची उमेदवारी जाहीर झाली आहे. पुण्यात स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट आणि महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्ष सीमाताई नरोडे यांनी शुक्रवारी त्यांच्या उमेदवारीची घोषणा केली.



वंगे यांनी १९८० पासून युगात्मा शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष म्हणून लातूर जिल्ह्यात शेतकऱ्यांसाठी आंदोलनाची चळवळ उभी केली आहे. ऊस दर आंदोलन, काळी ज्वारी खरेदी अभियान, तसेच नगदी पीक म्हणून सोयाबीन उत्पादनास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मराठवाड्यात सोयाबीनचा प्रसार करण्यासाठी वंगे यांनी स्वतःची ५० एकर जमीन विकून सोयाबीन प्लांट सुरू केला होता. लातूर येथे तत्कालीन पंतप्रधान व्ही. पी. सिंग आणि शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांच्या उपस्थितीत शेतकरी संघटनेचा मोठा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला.

वंगे यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर निलंगा, शिरूर अनंतपाळ, आणि देवणी तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# अंगावरील दागिने काढून दिले पडून व्याजाच्या मोहात

## सुवर्णा नवाल यांचा खून झाला हातोड्याच्या घावात





मयत सुवर्णा नवाल



**जळगाव (प्रशांत कुंडकर)**

जळगाव शहरातील पंचमुखी हनुमान मंदीरानजीक रणछोड नगर परिसरात राजेश दामोदर नवाल आणि सुवर्णा नवाल हे दोघे पती पत्नी रहात होते. इश्वर कृपेने सुखी संपन्न परिवाराचे धनी असलेले राजेश नवाल यांचे जळगाव शहरातील सुभाष चौकात यश ट्रेडर्स हे धान्य विक्रीचे दुकान आहे.

राजेश आणि सुवर्णा नवाल या दाम्पत्यास दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार लाभला होता. त्यांची मोठी विवाहीत मुलगी तिच्या परिवारासह पालघर जिल्ह्यातील वसई येथे राहते. दुसरी मुलगी दुबई येथे आर्किटेक्ट आणि मुलगा पुणे येथे आयटी इंजीनिअर म्हणून नोकरीला आहे. एकंदरीत नवाल दाम्पत्याचे इश्वरकृपेने सर्वकाही सुरळीत सुरु होते.

असे म्हणतात की मनुष्य ज्यावेळी प्रगतीपथावर वाटचाल करत असतो त्यावेळी त्याच्या हातून एखादी घोडचुक होण्याची दाट शक्यता असते. नेमक्या याच प्रगतीच्या कालावधीतच मनुष्य एखादी घोडचुक करतो आणि त्याचे परिणाम त्याला अथवा त्याच्या परिवाराला जीवनभर भोगावे लागतात. असाच काहीसा प्रकार सौ. सुवर्णा नवाल यांच्या बाबतीत घडण्यास सुरुवात झाली. घरात सर्वकाही सुरळीत सुरु असतांना सुवर्णा नवाल यांना व्याजाने पैसे देण्याचा आणि भिशी चालवण्याचा मोह झाला. याचा परिणाम म्हणून पैशांची गरज असलेल्या परिचीतांमधे हा संदेश जाण्यास वेळ लागला नाही. आजकाल प्रत्येकाला प्रापंचीक अडचणी सोडवण्यासाठी पैशांची गरज भासते. त्यासाठी अनेक जण व्याजाने पैसे घेण्यास तयार असतात.

सुवर्णाताई या नावाने परिचीत असलेल्या सुवर्णा नवाल या व्याजाने पैसे देतात आणि भिशी चालवतात हा संदेश संबंधितांमधे गेला. त्या माध्यमातून सरला धर्मेंद्र चव्हाण ही शिव कॉलनी परिसरात राहणारी महिला सुवर्णा नवाल यांच्या संपर्कात आली. बघता बघता सरलाने सुवर्णाताई यांचा चांगल्या प्रकारे विश्वास संपादन केला. सरला चव्हाण ही सुवर्णा नवाल यांची एकप्रकारे मध्यस्थ म्हणून काम बघू लागली. गरजूंना सुवर्णा नवाल यांच्यासमोर आणून त्यांना व्याजाने पैसे मिळवून देण्याचे काम सरला बघू लागली. त्यातून सुवर्णाताई नवाल यांचा सरलावरील विश्वास अजून घट्ट झाला.

वंदना लालबाबू पासवान नावाची मजुरीने कामाला जाणारी महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांना कर्ज मिळवून देण्याचे काम करत होती. बचत गटाच्या माध्यमातून एके दिवशी सरला आणि वंदना या दोन्ही महिला एकमेकींच्या संपर्कात आल्या. सरला हिस कमी व्याजदराने कर्जाची गरज भासली. त्यावेळी सरलाने वंदनाला कर्ज मिळवून देण्याची विनंती केली. वंदना हिने सरला चव्हाण हिस बचत गटात सहभागी करुन घेत कर्ज मिळवून दिले. त्या माध्यमातून वंदना आणि सरला या दोघींची चांगली ओळख निर्माण झाली.

राजेंद्र उर्फ आप्पा रामदास पाटील हा म्हसावद येथील रहिवासी सरलाच्या ओळखीचा होता. तो राजू आप्पा या नावाने म्हसावद या गावातील लोकांना परिचीत होता. त्याला वाळू वाहतुकीसाठी डंपर घ्यायचे होते. डंपर घेण्यासाठी त्याला पाच लाख रुपयांची गरज होती. त्यासाठी तो कर्ज मिळवण्याच्या प्रयत्नात होता. त्याने सरलाकडे आपली समस्या मांडली. त्यामुळे सरलाने राजु आप्पासाठी कर्ज मिळवण्यासाठी प्रयत्न सुरु केले.

सरलाने राजु आप्पाची वंदनासोबत ओळख करुन दिली. ओळख परिचय झाल्यानंतर सरलाने वंदनाला म्हटले की राजु आप्पा यास डंपर घेण्यासाठी पाच लाख रुपयांची गरज आहे. त्यासाठी त्याला कर्ज हवे आहे. तु तुझ्या ओळखीच्या कुणाकडून तरी पाच लाख रुपयांचे आप्पाला कर्ज मिळवून दे. सरलाचा परिचीत असलेल्या राजु आप्पासाठी पाच लाख रुपयांचे कर्ज मिळवण्यासाठी वंदनाने प्रयत्न केले. मात्र त्यात तिला यश आले नाही. त्यामुळे सरलानेच या कामी पुढाकार घेतला.

सौ. सुवर्णा नवाल या आपल्याला पाच लाख रुपयांची मदत करु शकतात हा विचार सरलाच्या मनात चमकून गेला. दुस-यासाठी मदत मागणे सोपे असते मात्र स्वत:साठी मदत मागणे कठीण असते हा विचार देखील सरलाच्या मनात आला. पाच लाख रुपयांची खरी गरज राजु आप्पाला होती आणि त्यासाठी सरला पुढाकार घेत होती. त्यासाठी तिने वंदनाला पुढे केले. वंदनाने सुवर्णाताई नवाल यांना आपली व्यक्तीगत अडचण सांगून स्वत:च्या नावे पैसे मागावे आणि मिळालेले पैसे नंतर स्वत: ताब्यात घेऊन ते राजु आप्पाला द्यावे असा प्लान सरलाने तयार केला. त्यानुसार सुवर्णा नवाल यांच्याकडे बुधवार दि. २६ जून २०२४ रोजी जाण्याचे निश्चित झाले.

बुधवार दिनांक २६ जून २०२४ रोजी वंदना आणि सरला या दोघी जणी सुवर्णाताई नवाल यांच्याकडे गेल्या. अगोदरच ठरल्यानुसार वंदनाने आपली खोटी खोटी अडचण सुवर्णा नवाल यांना सांगत पाच लाख रुपयांची मागणी केली. यावेळी सुत्रधार सरला ही मध्यस्थ असल्याचे बघून सुवर्णाताई यांनी व्याजाच्या मोहात पडून गळ्यातील मंगळपोत काढून दोघींच्या ताब्यात दिली. ही मंगलपोत तुम्ही गहाण ठेवा आणि मला दिवाळीपुर्वी व्याजासह परत आणून द्या असे सांगितले.

सुवर्णाताई यांनी स्वत:च्या गळ्यातून काढून दिलेली सोन्याची पोत हाती पडल्यानंतर ती गहाण ठेवून पैसे घेण्यासाठी दोघी जणी तातडीने सराफ बाजारात गेल्या. सराफ व्यावसायीकाने त्या सोन्याच्या मंगलपोतीला गहाण ठेवून घेत केवळ ३ लाख रुपये त्यांना दिले. त्या पोतीच्या ठेवीची पावती सरलाच्या नावे करण्यात आली. सरलाने तिन लाख रुपयांची रक्कम राजु आप्पाला देण्यासाठी आपल्या ताब्यात घेतली. पुर्ण पाच लाख रुपये जमा होण्यास दोन लाख रुपये कमी पडत होते. त्यामुळे दोन्ही जणी २ जुलै रोजी पुन्हा सुवर्णाताईंकडे पैसे मागण्यासाठी गेल्या.

यावेळी सुवर्णाताईने त्यांच्या घरातील सोन्याच्या चार लहान अंगठ्या, सोन्याचे कानातील झुमक्यांचे जोड काढून दिले. मात्र सर्व दागिने मला दिवाळीपुर्वी न चुकता व्याजासह आणून द्यावे असे सुवर्णाताईंनी दोघींना बजावले. यावेळी दोघी जणी पुन्हा सराफाकडे गेल्या. यावेळी त्यांना या गहान वस्तूंचे सराफाने ७५ हजार दिले. यावेळी वस्तूंच्या गहाण ठेवीची पावती वंदनाच्या नावे करण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत ओळखीचा फायदा घेत वंदनाचा पती लालबाबू यादव याने देखील सुवर्णाताईंकडून रोख ६० हजार रुपये व्याजाने घेतले.

बघता बघता दिवाळीचा सण जवळ आला. ठरल्यानुसार सुवर्णाताई नवाल यांना दिवाळी सणानिमित्त पुजेसाठी त्यांचे स्त्रीधनाचे दागिने हवे होते. त्यासाठी त्या वारंवार सरला आणि वंदना या दोघींना मोबाईलद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न करु लागल्या. दरम्यानच्या कालावधीत वंदनाचा पती लालबाबू याने देखील सुवर्णाताई नवाल यांच्याकडून ओळखीचा गैरफायदा घेत व्याजाने ६० हजार रुपये रोख नेले होते. तो ते पैसे देखील त्यांना परत करत नव्हता.

त्यामुळे सुवर्णाताई मोबाईलच्या माध्यमातून त्याच्याशी देखील वारंवार संपर्क साधत होत्या. माझ्या दागिन्यांबाबत माझे पती मला दिवाळीच्या वेळी विचारणा करतील. त्यापुर्वी तुम्ही मला दागिने आणून द्या अशी आर्त विनवणी सुवर्णाताई दोघी जणींना करत होत्या. मात्र अद्यापपावेतो त्यांना ना मुद्दल मिळाली, ना व्याज मिळाले ना त्यांचे गहाण ठेवलेले दागिने मिळाले. त्यामुळे त्या हैरान झाल्या. सुवर्णाताईंच्या रोजच्या तगाद्याला सरला चव्हाण, राजेंद्र उर्फ राजुआप्पा रामदास पाटील आणि लालबाबू रामनाथ पासवान हे तिघे वैतागले होते.

आपण सुवर्णाताईंना जीवानिशी ठार केले तर आपल्याला त्यांचे पैसे द्यावे लागणार नाही आणि आपली त्यांच्या तगाद्यातून कायमची सुटका होईल असा कुविचार सरला चव्हाण, सरलाचा मित्र राजुआप्पा आणि वंदनाचा पती लालबाबू पासवान या तिघांच्या मनात आला. पैसे परत करण्याच्या बहाण्याने सुवर्णाताईंच्या घरी जावून त्यांचा कायमचा नायनाट करण्याचा तिघांनी बेत आखला. सुवर्णाताईंचे पती राजेश दामोदर नवाल हे सकाळी साडेदहा वाजता दुकानात जातात आणि दुपारी अडीच वाजेच्या सुमारास जेवण करण्यासाठी घरी येतात हे तिघांना ठाऊक होते. दुपारी साडेतीन ते पावणेचार वाजेच्या सुमारास विश्रांती घेतल्यानंतर पुन्हा दुकानावर जातात हा नित्यक्रम देखील तिघांनी माहित केला होता.

१० ऑक्टोबर २०२४ हा सुवर्णाताई नवाल यांच्या जीवनातील अखेरचा दिवस उजाडला. या दिवशी अतिशय निघृणपणे त्यांची हत्या होणार असल्याचे नियतीच्या मनात होते. या दिवशी नेहमीप्रमाणे सुवर्णाताई नवाल यांचे पती राजेश नवाल हे सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास सुभाष चौकातील त्यांच्या दुकानावर गेले. दुपारी सव्वा दोन वाजेच्या सुमारास ते जेवण करण्यासाठी घरी आले. या दिवशी त्यांचा पुणे येथे नोकरीनिमीत्त राहणारा मुलगा यश घरी येणार होता. दुपारी त्यांचे पत्नी सुवर्णाताई यांच्यासोबत बोलणे झाले ते शेवटचेच. पत्नीच्या हातून वाढलेले जेवण आणि सोबत बसून केलेल्या गप्पाटप्पा देखील अखेरच्या ठरल्या. थोडा वेळ आराम करुन साडेतीन वाजता राजेश नवाल दुकानावर गेले.

त्यानंतर सायंकाळी पैसे परत करण्याच्या बहाण्याने राजुआप्पा पाटील, सरला चव्हाण आणि लालबाबू पासवान असे तिघेजण सुवर्णाताई नवाल यांच्या घरी गेले. त्यावेळी सुवर्णाताई नवाल या घरी एकट्याच होत्या. कापडात गुंडाळून आणलेल्या लोखंडी हातोड्याने आप्पा पाटील याने सुवर्णाताई नवाल यांच्या डोक्यावर जोरदार हल्ला केला. अचानक झालेल्या या जीवघेण्या हल्ल्यात सुवर्णाताई फरशीवर कोसळल्या. त्यांचे डोके फुटून त्यातून रक्त वाहू लागले. त्याचवेळी लालबाबू पासवान याने देखील सुवर्णाताई नवाल यांच्या डोक्यावर त्याच हातोड्याने दोन वेळा हल्ला केला. दुस-यांदा झालेल्या हल्ल्याने सुवर्णाताई नवाल यांची हालचाल बंद झाली. १० ऑक्टोबरची रात्र बघणे त्यांच्या नशीबी नव्हते. त्यानंतर सरला व आप्पा पाटील हे दोघेजण मोटार सायकलने पसार झाले. लालबाबू देखील तेथून निघून गेला. या खूनी हल्ल्यात वापरलेला कापडात गुंडाळलेला लोखंडी हातोडा आप्पा पाटील याने लालबाबू यास कुठेतरी फेकून देण्यास सांगितले होते. तो लोखंडी हातोडा लालबाबू याने नर्सरीनजीक असलेल्या नाल्याच्या बाजूला लपवून ठेवला आणि त्यावरील कापड नाल्यात फेकून दिला.

त्यानंतर मयत सुवर्णा नवाल यांचे पती राजेश नवाल यांनी रात्री सव्वा आठ वाजेनंतर नेहमीप्रमाणे दुकान बंद केले. नवी पेठ परिसरातील सारस्वत बॅकेच्या एटीएममधे पैसे जमा करुन त्यांनी नेरी नाका परिसरात राहणा-या बहिणीकडून त्यांचे प्रेस केलेले कपडे ताब्यात घेतले. त्यानंतर पांडे चौकातून दुधाची पिशवी विकत घेतली. त्यानंतर रात्री पावणे नऊ वाजेच्या सुमारास त्यांनी घर गाठले.

यावेळी त्यांच्या घराचा दरवाजा लोटलेला होता. घरातील हॉल व बेडरुमचा लाईट सुरु असल्याचे त्यांनी पाहिले. हॉलमधे त्यांना पत्नी सुवर्णा यांचे पाय दिसले. कदाचीत पत्नी व्यायाम करत असेल असा त्यांनी मनाशी समज केला. हातातील दुधाची पिशवी आणि प्रेसचे कपडे त्यांनी खुर्चीवर ठेवले. त्यानंतर त्यांनी पत्नीकडे निरखून पाहिले असता त्यांच्या पायाखालची जणूकाही वाळूच सरकली. त्यांना जणूकाही अचानक शॉक बसला. त्यांना त्यांच्या डोळ्यावर विश्वासच बसत नव्हता. त्यांच्या मुखातून शब्द फुटेनासा झाला.

पत्नी रक्ताच्या थारोळ्यात पडली असल्याचे चित्र त्यांना दिसून आले. तिला हलवून पाहिले असता ती कोणतीही हालचाल करत नव्हती. घाबरलेल्या अवस्थेत त्यांनी शेजारी राहणा-या भावाच्या पत्नीला बोलावले. त्यांच्या भावाची पत्नी देखील घटनास्थळावरील भयावह चित्र बघून काहीवेळ भयभीत झाली. स्वत:ला सांभाळत राजेश नवाल यांनी त्यांचे परिचीत असलेले डॉ. सारंग जोशी व पोलीसांना फोन केला. काही वेळाने त्यांच्या घरी डॉक्टर आले. डॉ. सारंग जोशी यांनी सुवर्णा नवाल यांची तपासणी केली असता त्या मयत झाल्या असल्याचे त्यांनी सर्वांना सांगितले.

या घटनेची माहीती एमआयडीसी पोलिस स्टेशनला समजल्यानंतर पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वप्रथम सहायक पोलिस निरीक्षक अनिल वाघ व त्यांच्या सहका-यांनी घटनास्थळ गाठले. मयत सुवर्णा नवाल यांचे पती राजेश नवाल यांनी दिलेल्या फिर्यादींनुसार एमआयडीसी पोलिस स्टेशनला अज्ञात मारेक-यांविरुद्ध खूनाचा गुन्हा नोंद करण्यात आला. गु.र.नं. ७१८/२४ भारतीय न्याय संहिता १०३ (१) नुसार दाखल गुन्ह्याचा पुढील तपास एमआयडीसी पोलिस स्टेशनचे पो.नि. दत्तात्रय निकम यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. अनिल वाघ यांच्याकडे देण्यात आला. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला.

या गुन्ह्याच्या तपासादरम्यान मयत सुवर्णा नवाल यांचे मोबाईल कॉल रेकॉर्ड तपासण्यात आले. घटनेच्या दिवशी दिवसभरात एकाच क्रमांकावर सारखे सारखे कॉल झाल्याचे पोलिसांना आढळून आले. याशिवाय घटनास्थळ परिसरातील सिसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले तसेच गुप्त बातमीदारांची देखील मदत घेण्यात आली.

मोबाईल कॉल तपशील, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त बातमीदारांनी दिलेली माहिती या सर्वांचा मेळ बसवत क्रमाक्रमाने लालबाबू रामनाथ पासवान, राजेंद्र उर्फ आप्पा रामदास पाटील आणि सरला धर्मेंद्र चव्हाण या तिघांना चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले. तिघांना वेगवेगळ्या पद्धतीने आणि एकत्रीतपणे बोलावून चौकशी करण्यात आली. पोलिसी खाक्या बघून तिघांनी अखेरीस आपला गुन्हा कबुल केला. मयत सुवर्णा नवाल या व्याजाने पैसे देत होत्या. त्या भिशी देखील चालवत होत्या असे समजते. त्यांनी अंगावरील दागिने वंदना पासवान, सरला चव्हाण यांना दिले होते. ते दागिने गहाण ठेवून या दोघींनी व्याजाने पैसे घेतले होते. दिवाळीपुर्वी व्याजासह दागिने परत आणून देण्याच्या बोलीवर हा व्यवहार झाला होता. वंदना पासवान हिचा पती लालबाबू पासवान याने देखील रोख ६० हजार रुपये सुवर्णा नवाल यांच्याकडून व्याजाने घेतले होते.

दिवाळी जवळ आल्याने सौ. नवाल या दोघींना व्याजासह दागिने आणि लालबाबू यास व्याजासह पैसे मागत होत्या. त्यांच्या नेहमीच्या तगाद्याला सर्वजण वैतागले होते. त्यांची दागिने व पैसे व्याजसह परत देण्याची तयारी नव्हती. सुवर्णा नवाल यांना जीवानिशी संपवल्यास आपली व्याजासह पैसे, दागिने देण्यापासून कायमची सुटका होईल या उद्देशाने त्यांचा लोखंडी हातोड्याने डोक्यावर हल्ला करुन खून करण्यात आला. मात्र तांत्रीक विश्लेषण, गुप्त बातमीदार यांच्या बळावर हा गुन्हा कमी वेळात उघडकीस आला.

जिल्हा पोलिस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप अधिक्षक संदीप गावीत, स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. बबन आव्हाड, स.पो.नि. दत्तात्रय पोटे, सहायक फौजदार अतुल वंजारी, संजय हिवरकर, हे.कॉ. अक्रम शेख, विशाल महाजन, पोलिस नाईक राहुल पाटील, पो.कॉ. प्रविण भालेराव, इश्वर पाटील, एमआयडीसी पोलिस स्टेशनचे पो.नि. दत्तात्रय निकम, सहायक पोलिस निरीक्षक अनिल वाघ, पोलिस उप निरीक्षक शरद बागल, हे.कॉ. रतन गिते आदींनी या तपासकामी सहभाग घेतला.

# अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघातून महायुतीच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर गणेश भोसले, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजपाचे समन्वयक महेंद्र भैय्या गंधे, सचिन जाधव, किशोर डागवाले, अविनाश घुले, प्राध्यापक माणिकराव विधाते, संजय चोपडा, रवींद्र बारस्कर, अमोल गाडे, प्रा. अरविंद शिंदे, संजय ढोणे, सतीश शिंदे, अजय चितळे, उदय कराळे, नरेंद्र कुलकर्णी, अभिजीत खोसे, वैभव ढाकणे, ज्ञानेश्वर काळे, अमित गटणे, मनोज ताठे, अजिंक्य बोरकर, सुमित कुलकर्णी आदी उपस्थित होते.

यावेळी महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप म्हणाले की, विधानसभेची निवडणूक ही विकासाच्या कामावर लढवली जात असून सर्वांना बरोबर घेऊन जनतेचे आशीर्वाद घेतले जातील, निवडणूक लढवीत असताना गेल्या दहा वर्षांमध्ये केलेली विकास कामे जनतेपर्यंत घेऊन जाण्याचे काम केले आहे, आपल्या शहरा बद्दल सकारात्मक दृष्टिकोन ठेवून विकासाच्या योजना राबवत आहे. जनतेच्या मतरुपी आशीर्वादामुळे माझा विजय निश्चित असून पुढील ५ वर्षात विकास कामातून शहराचा कायापालट करेल असे ते म्हणाले.



# डॉ.बाबासाहेब देशमुखांना शेकाप पक्षाची उमेदवारी

## शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केली घोषणा

**सांगोला | प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचे सर्वेसर्वो, देशाचे नेते शरदचंद्र पवार यांनी सांगोला विधानसभा मतदार संघात शेतकरी कामगार पक्षाचे काम करणार असल्याचे मला स्पष्टपणे सांगितले आहे.त्यामुळे शेकापच्यावतीने व सांगोल्यातील जनतेच्यावतीने त्यांचे आभार मानतो. शेतकरी कामगार पक्षाच्या दृष्टीने आजचा हा ऐतिहासीक क्षण असून शेतकरी कामगार पक्षाचा आत्मा हा सांगोला तालुका आहे. कष्टकरी, गरीब, वंचित माणूस जोपर्यंत लालबावट्यासोबत आहे तोपर्यंत या तालुक्यातून लालबावटा कोणीही उतरू शकत नाही असे सांगून त्यांनी सांगोला विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीसाठी शेकापक्षाकडून पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या नावाची घोषणा केली. डॉ.अनिकेत देशमुख यांनी पक्षासाठी मोठा त्याग केला असून त्यांनी पक्ष कधीही वार्यावर सोडणार नसल्याचे भाई जयंत पाटील यांनी केली.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाचा भव्य मेळावा काल सांगोला येथे संपन्न झाला. या शेतकरी मेळाव्या प्रसंगी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील बोलत होते. व्यासपीठावर रतनबाई गणपतराव देशमुख, शोभाताई पाटील, डॉ.बाबासाहेब देशमुख, डॉ.अनिकेत देशमुख, डॉ.निकिता देशमुख, मारुतीआबा बनकर, बाळासाहेब एरंडे, चिटणीस दादाशेठ बाबर, माजी चिटणीस प्रा.विठ्ठलराव शिंदे सर यांच्यासह शेतकरी कामगार पक्ष व पुरोगामी युवक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.पुढे बोलताना भाई जयंत पाटील म्हणाले की, सांगोला तालुक्याच्या दृष्टीने आजचा हा ऐतिहासिक क्षण आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या दृष्टीने सांगोल्यात चांगले वातावरण असून बाईसाहेबांसाठी आजचा हा मोठा सण आहे. स्वतःचे आयुष्य जनतेसाठी अर्पण करणारा व्यक्ती डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या रूपाने आज आपण जनतेसमोर आणत आहोत. डॉ.बाबासाहेब देशमुख व डॉ.अनिकेत देशमुख हे दोघेही गणपतराव देशमुख यांची परंपरा यशस्वीपणे चालवतील यात कोणतीही शंका नाही. डॉ. बाबासाहेब आणि डॉ.अनिकेत हे दोघे विद्वान असून पक्षाबद्दलची आत्मीयता ते कधीही विसरणार नाहीत. देशमुख कुटुंबामध्ये विधानसभेसाठी उमेदवारी देण्याची जबाबदारी माझी व पदाधिकार्यांची होती ती जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. आता यापुढील जबाबदारी जनतेची असून विजयासाठी सर्वजण रात्रीचा दिवस करतील अशी अपेक्षा व्यक्त करत शेकापचे सर्व तरुण उमेदवार विधीमंडळात जाणार असून सध्याचे मंत्रिमंडळ हे आजपर्यंतच्या काळातील सर्वात वाईट सरकार असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्राची वाट लावली असून महाविकास आघाडी भक्कम राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.






यावेळी विधानसभेचे उमेदवार डॉ.बाबासाहेब देशमुख म्हणाले की, सत्तेसाठी महाराष्ट्रात विचार, निष्टा, तत्वे सोडली जात आहेत. मात्र पक्षाच्या संकटाच्या काळात देखील शेतकरी कामगार पक्षाचा कोणताही कार्यकर्ता जागचा हलला नाही हेच आबासाहेबांच्या निष्ठेचे उदाहरण आहे. निवडणूक तिरंगी, चौरंगी, पंचरंगी लागो काही फरक पडणार नाही, नुसत्या डरकाळ्या फोडू नका... मैदानात या आणि कुस्ती धरा असे आवाहन केले. त्याचप्रमाणे आबासाहेबांनी जातीपातीला कधीही थारा दिला नाही त्याच पद्धतीने मी आणि अनिकेत काम करणार असल्याचा विश्वास व्यक्त करुन उमेदवारी जाहीर केल्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले. डॉ.अनिकेत देशमुख म्हणाले की, आजच्या गर्दीने माझे मन भरून आले आहे. सध्या महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापले आहे. सांगोला तालुक्याचा दृष्टीने आजचा मेळावा हा ऐतिहासिक क्षण असून सांगोल्याचे राजकारण लोकप्रतिनिधींनी ढवळले आहे. विकासाच्या नावाखाली टक्केवारीचे गणित मांडून लोकशाहीला कलंक लावला जात आहे. विरोधकांकडून आम्हा भावंडात मतभेद पसरविण्यासाठी नेहमी प्रयत्न करण्यात आले, आमिषे दाखवण्यात आली पण आबासाहेबांची साठ वर्षाची पुंजी आमच्या सोबत आहे ती सहज कशी सुटणार... आबासाहेबांचा साठ वर्षाचा इतिहास असताना ही मोळी सुटू देणार नाही असा विश्वास देत आपण सर्वांनी ताकतीने निवडणूक लढूया आणि जिंकूया. आम्हा दोघांस आज व्यासपीठावर पाहून तालुक्यातील दोघांना झोप येणार नाही. पक्षातील सर्वांनी आता गटतट विसरा, मी आणि बाबासाहेब एकच आहोत आणि एकच राहणार असल्याचे सांगत डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या पाठीशी पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनीं खंबीरपणे उभे रहावे अशी विनंतीही त्यांनी यावेळी केली. मेळाव्याचे प्रास्ताविक विनायक कुलकर्णी सर यांनी तर आभार ॲड.विशालदिप बाबर यांनी मानले. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## मुस्लिम समाजाकडून दीपकआबा साळुंखे पाटील यांचा सत्कार

**सांगोला | प्रतिनिधी**

जिल्ह्याचे नेते माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. त्यानंतर दीपकआबा साळुंखे पाटील हे सांगोल्यात आल्यानंतर संपर्क कार्यालयात मुस्लिम समाजाकडून दीपकआबा साळुंखे पाटील यांचा सत्कार करण्यात आला. दिपकआबांना आमदार करण्यासाठी पायाला भिंगरी बांधून विधानसभा निवडणुकीत प्रचार करण्याचा विश्वास मुस्लिम समाजाकडून देण्यात आला.



दीपकआबा साळुंखे पाटील यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केल्यानंतर त्यांच्या समर्थकांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले असून पक्ष प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या वाढली आहे. पक्ष प्रवेश केल्यानंतर दीपकआबा साळुंखे पाटील हे सांगोल्यात आल्यानंतर त्यांच्या संपर्क कार्यालयात मुस्लिम समाजाकडून दीपकआबांचा सत्कार करण्यात आला. विधानसभेच्या निवडणुकीत पायाला भिंगरी बांधून घराघरात विजयाची मशाल पोहोचवणार असून दीपकआबांना विक्रमी मताधिक्य देण्यासाठी जीवाचे रान करण्याचा निर्धार मुस्लिम समाजाच्या कार्यकर्त्यांनी दीपकआबांजवळ व्यक्त केला.यावेळी रियाजभाई मुजावर, पोपट खाटीक, माजी नगरसेवक जुबेरभाई मुजावर, मोहसीन मणेरी, बाकीर मुलाणी सर, फिरोज मुलाणी, महंमदगौस मुजावर सर, नूर मणेरी, मिनाज मुलाणी, खलील शेख यांच्यासह मुस्लिम समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## वझरे गावच्या सरपंचपदी शिवसेनेच्या सौ. बानू चव्हाण तर उपसरपंचपदी लक्ष्मण वाघमारे यांची बिनविरोध निवड

### आ.शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते सत्कार संपन्न



**सांगोला | प्रतिनिधी**

सांगोला तालुक्यातील वझरे गावच्या सरपंचपदी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या गटाच्या शिवसेनेच्या सौ. बानू मल्हारी चव्हाण यांची सरपंचपदी तर लक्ष्मण गोविंद वाघमारे यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाली . त्याबद्दल आमदार शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते संपर्क कार्यालयामध्ये नूतन सरपंच ,उपसरपंचांचा सत्कार करून भावी राजकीय वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी विधानसभा प्रमुख प्रा. संजय देशमुख, शिवसेनेचे शिवाजी घेरडे, शिवसेनेचे नेते दादासाहेब वाघमोडे सर, उत्तम सरगर सर, तसेच वझरे गावचे माजी उपसरपंच बाबुराव जाधव, माजी सरपंच भिकू वाघमारे, सचिन यादव, विजय कोटे, आप्पा चव्हाण, उमाजी चव्हाण, स्वप्निल रेड्डी, वसंत रामचंद्र पाटील, राजू पाटील, मल्हारी चव्हाण, शिवाजी चव्हाण ,विलास चव्हाण, दत्तात्रय शिवाप्पा पाटील ,भारत रेड्डी ,बलभीम चव्हाण, लक्ष्मण मंडले, मोहन चव्हाण, समाधान यादवशेठ, श्रीधर यादव, पिंटू यादव ,रमेश यादव आदी मान्यवर उपस्थित होते. आमदार शहाजीबापू पाटील यांच्या शिवसेना गटाच्या वझरे गावच्या सरपंचपदी बानू चव्हाण तर उपसरपंचपदी लक्ष्मण वाघमारे यांची निवड झाल्याबद्दल आमदार शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते सत्कार करून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मान्यवरांकडून सरपंच, उपसरपंच यांचे अभिनंदन करण्यात आले.

## दीपावली भेटवस्तू वाटपाचा कार्यक्रम उत्साहात

**सांगोला | प्रतिनिधी**

राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब महिला अर्बन को-ऑपरेटि क्रेडिट सोसायटी सांगोला या संस्थेचा दीपावली भेटवस्तू वाटपाचा कार्यक्रम आज संस्थेच्या कार्यालयात उत्साहात पार पडला. भेटवस्तू वाटपाच्या कार्यक्रमास अनेक महिला सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेच्या चेअरमन सौ.शोभा संजय देशमुख या होत्या. सर्व उपस्थित महिला सभासदांना दीपावली भेटवस्तू म्हणून ५ किलो साखर व आकर्षक पिशवीचे वाटप करणेत आले. सभासदांच्या विश्वास व सहकार्याने संस्थेची वाटचाल जोमाने सुरू असून पुढच्या वर्षी यापेक्षा भक्कम भेटवस्तू सभासदांना देण्याचे आश्वासन संस्थेच्या चेअरमन यांनी यावेळी बोलताना दिले. तसेच सर्व सभासदांनी संस्थेच्या कार्यालयात येऊन लवकरात लवकर आपली भेट वस्तू घेऊन जावे असे अवाहन त्यांनी यावेळी केले. या कार्यक्रमास



चेअरमन सौ शोभा संजय देशमुख व व्हाईस चेअरमन सौ संगीता राहुल टकले त्याचबरोबर सर्व संचालिका गीतांजली प्रवीण मोहिते शुभांगी तायाप्पा माने मनीषा पंडित सुरवसे मेहजबीन कम्रद्दीन खतीब संगीता सोमाआबा मोठे संचिता दत्तात्रय टापरे रंजना रमेश नलवडे मंगल दत्तात्रय दौंडे त्याचबरोबर सभासद महिला सौ इंदुबाई महादेव इतापे सौ सीताबाई किसन इतापे सौ अंजना बंडू इतापे सौ सुरेखा कैलास इतापे सौ वर्षा तानाजी कारंडे सो मीरा ओंकार बोत्रे सौ सिंधू उत्तम बोत्रे सौ कोमल तेजस बोत्रे सौ प्रज्ञा सुनील चौगुले सौ मंगल वसंत चौगुले सौ छाया संभाजी घाडगे सौ नकुशा महादेव खडतरे सौ मीनाक्षी युवराज गायकवाड मोनाली महादेव लोकरे उपस्थित होत्या. कर्मचारी वैभव बबन इंगोले महेश विलास इंगोले संकेत बापूसो गायकवाड सागर श्रीमंत वगरे दीपक राजाराम सावंत अतुल दत्तात्रय काशीद सीताबाई भारत सुरवसे

# वैभव देवरेने हॉटेल व्यावसायिकाकडे मागितली २५ लाखांची खंडणी

**नाशिक | मनोज उतेकर**

हॉटेल व्यावसायिकाला व्याजाने दिलेल्या पैशाची परतफेड करूनही त्यांच्याकडे २५ लाख रुपयांची बेकायदेशीर खंडणी मागणारा खासगी सावकार वैभव देवरे आणि त्याचा साला निखिल पवार यांच्याविरुद्ध आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी सचिन विलास बरडे (रा. इंदिरानगर, नाशिक, मूळ रा. काळेवाडी, जि. अहमदनगर) हे हॉटेल व्यावसायिक असून, ते खरेदी-विक्रीचे काम करतात. त्यांचे आई-वडील, पत्नी, दोन मुले हे सर्व जण गावी राहतात. बर्डे यांनी सन २०२० मध्ये बॉबी काळे यांच्याकडून पाच वर्षांकरिता भाडेतत्त्वावर इंदिरानगर येथे पेठेनगर कॉर्नरला असलेले हॉटेल कंदुरी हे चालविण्यासाठी घेतले. या हॉटेलमध्ये शाकाहारी व मांसाहारी जेवण मिळत असल्याने बरेचसे ग्राहक येत होते.

त्यातून ओळखी वाढत गेल्या. सन २०२१ पासून हॉटेलमध्ये आरोपी वैभव यादवराव देवरे हा त्याच्या कुटुंब व त्याच्या मित्रांसह नियमित जेवणासाठी येत होता. त्यातून गप्पा मारल्यानंतर त्याच्याशी ओळख झाली. सन २०२२ मध्ये फिर्यादी बरडे यांना जमीन खरेदीसाठी पैशांची गरज होती. त्यासाठी कुठून पैसे मिळतील, याचा ते शोध घेत होते.

त्यादरम्यान वैभव देवरे हा हॉटेलमध्ये जेवायला आला असता त्याने मी व्याजाने पैसे देण्याचा व्यवसाय करतो. तुम्हाला जर पैसे पाहिजे असतील, तर शेकडा दहा टक्के व्याजदराने पैसे देईन, असे सांगितले. त्यानंतर फिर्यादींना चार लाख रुपयांची गरज असल्याने देवरे याने पैसे देण्यास होकार दिला.

त्यानंतर २२ मार्च २०२२ रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास खासगी सावकार वैभव देवरे व त्याचा साला निखिल नामदेव पवार हे दोघे एका कारने हॉटेल कंदुरी येथे चार लाख रुपये घेऊन आले. ते पैसे बरडे यांना देत असताना त्यातून पहिल्या महिन्याचे व्याज म्हणून ४० हजार रुपये ॲडव्हान्स म्हणून कापून घेत फिर्यादी बरडे यांच्या हातात प्रत्यक्षात ३ लाख ६० हजार रुपये दिले. हे पैसे घेतल्यानंतर दरमहा बरडे हे व्याजाचे पैसे फोन पे अथवा रोख स्वरूपात वैभवकडे किंवा त्याचा साला निखिलकडे देत होते. एप्रिल ते ऑगस्ट २०२२ पर्यंतच्या व्याजाची रक्कम म्हणून एकूण २ लाख रुपयांची नियमितपणे परतफेड केली; मात्र फिर्यादी बरडे यांना हॉटेलच्या कामासाठी



पुन्हा आर्थिक अडचण आली.

म्हणून त्यांनी दि. ४ सप्टेंबर २०२२ रोजी वैभव देवरे याच्याकडे पुन्हा एक लाख रुपयांची मागणी केली. त्यानंतर त्याच दिवशी सायंकाळी वैभव देवरे स्वत: एक लाख रुपये घेऊन हॉटेलवर देण्यासाठी आला. ही रक्कम देताना पहिल्या महिन्याचे ॲडव्हान्स व्याज कापून त्याच्या हातात ९० हजार रुपयांची रोकड दिली. फिर्यादी बरडे हे खासगी सावकार देवरे व निखिल पवार यांना दोन्ही आर्थिक व्यवहारांचे प्रत्येक महिन्याला ५० हजार रुपयांप्रमाणे ऑक्टोबर २०२२ ते फेब्रुवारी २०२४ पर्यंत ऑनलाईन व रोखस्वरूपात एकूण ८ लाख ५० हजार रुपये दिले. पैसे देताना व्याजापोटी ॲडव्हान्स म्हणून कापून घेतलेले दोन्ही व्यवहारांचे ५० हजार असे मिळून एकूण नऊ लाख रुपये व्याज म्हणून दिले आहेत. फेब्रुवारी २०२४ नंतर हॉटेलमालक बरडे यांची आर्थिक स्थिती खराब झाली.

त्यानंतर फिर्यादी व्याजाचे पैसे देऊ शकले नाहीत, म्हणून आरोपी देवरे व पवार यांनी त्यांच्याकडे व्याजाच्या पैशाची मागणी केली. ते पैसे दिले नाहीत म्हणून फिर्यादींना शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. व्याजाचे पैसे दिले नाहीत म्हणून त्यांनी दरदिवशी ५० हजारांचा दंड लावला व व्याजाने दिलेल्या पैशांपोटी पाच लाख रुपयांची बेकायदेशीररीत्या खंडणी मागितली.

त्यानंतर एके दिवशी हॉटेल बंद करीत असताना आरोपी देवरे तेथे आला व त्याने व्याजाच्या पैशाची मागणी करून दमबाजी केली, तसेच त्याच्या साल्याने लाकडी दांड्याने मारहाण केली. त्यानंतर फिर्यादी बरडे यांनी मित्रपरिवार व नातेवाईकांकडून हातउसनवार करून पाच लाख रुपये जमा केले व ते देवरे याला दंड म्हणून दिले. त्यानंतर दहा लाख, पाच लाख व पुन्हा पाच लाख याप्रमाणे रक्कम टाकलेली सही करून तीन चेक बळजबरीने लिहून घेतले.

त्यानंतर संपूर्ण आर्थिक देवाणघेवाणीचे प्रकरण मिटवायचे असेल, तर आरोपी वैभव देवरे व निखिल पवार यांनी बरडे यांच्याकडे २५ लाख रुपयांची मागणी केली. अशा वारंवार मिळणार्या धमक्यांमुळे बरडे हे हॉटेल बंद करून गावी निघून गेले. त्यानंतर वैभव देवरे याने फिर्यादी यांना शोधून काढले व त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना जिवे ठार मारण्याच्या धमक्या देऊन खंडणीची मागणी केली.

देवरे व त्याचा साला निखिल पवार यांच्या धमक्यांना घाबरून फिर्यादी बरडे हे त्यांच्या कुटुंबीयांसह पुणे येथे राहण्यासाठी गेले; मात्र तेथेही जाऊन देवरे व पवार यांनी पैशांची मागणी करून धमकी दिली. या त्रासाला कंटाळून अखेर सचिन बरडे यांनी इंदिरानगर पोलीस ठाण्यात खासगी सावकार वैभव देवरे व त्याचा साला निखिल पवार यांच्याविरुद्ध फिर्याद दिली आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत